सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक -१८८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. २६ ऑगस्ट २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## उद्यापासून भारतावर ५०% अमेरिकन टॅरिफ

### अमेरिकेने जारी केली २५% अतिरिक्त टॅरिफची अधिसूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६नवी दिल्ली**

अमेरिकन सरकारने भारतातून आयात होणाऱ्या वस्तूंवर अतिरिक्त २५% कर लादण्याची अधिकृत अधिसूचना जारी केली आहे. दंड म्हणून लावण्यात आलेला हा कर भारतीय वेळेनुसार २७ ऑगस्ट रोजी सकाळी ९:३१ वाजल्यापासून लागू होईल.

रशियाकडून तेल खरेदी केल्याबद्दल दंड म्हणून राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ६ ऑगस्ट रोजी हा कर जाहीर केला. यापूर्वी व्यापार तूट लक्षात घेऊन ७ ऑगस्टपासून भारतावर २५% कर लादण्यात आला होता.




याचा अर्थ असा की भारतीय वस्तूंवरील एकूण कर आता ५०% पर्यंत असेल.त्यात म्हटले आहे की, 'या दस्तऐवजाच्या यादीत नमूद केलेले शुल्क भारतातून येणाऱ्या वस्तूंवर लागू होईल. या वस्तू वापरासाठी अमेरिकेत आणल्या जातील किंवा वापरासाठी गोदामातून बाहेर काढल्या जातील. हा नियम २७ ऑगस्ट २०२५ रोजी मध्यरात्री १२:०१ वाजता एडढ पासून लागू होईल.

या कारवाईवर भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले होते– अमेरिकेने अलिकडेच रशियाकडून भारताच्या तेल आयातीवर लक्ष केंद्रित केले आहे.आम्ही आधीच स्पष्ट केले आहे की आम्ही बाजारातील परिस्थितीनुसार तेल खरेदी करतो आणि १४० कोटी भारतीयांची ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करण्याचे उद्दिष्ट आहे.अमेरिका भारतावर अतिरिक्त शुल्क लादत आहे हे अत्यंत दुर्दैवी आहे, तर इतर अनेक देश स्वतःच्या हितासाठी तेच करत आहेत. आम्ही पुन्हा एकदा सांगतो की ही पावले अन्याय्य, बेकायदेशीर आणि चुकीची आहेत. भारत आपल्या राष्ट्रीय हितांचे रक्षण करण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलेल.

**पंतप्रधान म्हणाले– आम्ही दबाव सहन करण्याची क्षमता वाढवत राहू**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक दिवस आधी अहमदाबादमध्ये ट्रम्पच्या शुल्काचा उल्लेख न करता म्हटले होते की, 'माझे सरकार कधीही लहान उद्योजक, शेतकरी आणि पशुपालकांचे कोणतेही नुकसान होऊ देणार नाही. कितीही दबाव आला तरी आम्ही सहन करण्याची आमची क्षमता वाढवत राहू.

## दिवाळीपूर्वी मोठी भेट! कपडे, खाद्य पदार्थांवरील जीएसटी ५% होणार?

### अनेक वस्तू आणि सेवांवरील टॅक्सही घटणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६नवी दिल्ली**

तुम्ही इतक्यात काही खरेदी करण्याचा विचार करत असाल तर थोडं थांबा. कारण, सरकार दिवाळीपूर्वीच सामान्यांना आनंदाची बातमी देण्याची तयारी करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्ट रोजी लाल किल्ल्यावरून जीएसटीमध्ये सुधारणा करण्याची घोषणा केली होती. या घोषणेनुसार, आता जीएसटीच्या दोनच दरांचा (५% आणि १८%) प्रस्ताव आहे. त्यानंतर २० आणि २१ ऑगस्ट रोजी दिल्लीत झालेल्या मंत्रिगटाच्या बैठकीत १२% आणि २८% जीएसटी स्लॅब रद्द करण्याच्या केंद्राच्या प्रस्तावालाही मंजुरी मिळाली आहे. आता याबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे.

नेक्स्ट जनरेशन जीएसटी रिफॉर्म अंतर्गत सामान्य नागरिकांवरील




कराचा बोजा कमी करण्यासाठी, विशेषतः खाद्यपदार्थ आणि कपड्यांवरील जीएसटी ५ टक्के केला जाऊ शकतो. एका प्रमुख वृत्तसंस्थेच्या अहवालानुसार, सरकार काही सामान्य सेवांवरील जीएसटी दर देखील कमी करून १८% वरून ५% वर आणण्याचा विचार करत आहे.

याशिवाय, बांधकाम आणि पायाभूत सुविधा क्षेत्राची गेल्या अनेक वर्षांपासूनची मागणी लक्षात घेऊन सिमेंटसह इतर अनेक वस्तूंवरील जीएसटी कमी करण्याच्या योजनेवरही चर्चा केली जाऊ शकते. सिमेंटवरील जीएसटी २८% वरून १८% पर्यंत कमी करण्याचा प्रस्ताव आहे. या संभाव्य बदलांमध्ये टर्म इन्शुरन्स आणि आरोग्य विमा पॉलिसींवरील जीएसटी पूर्णपणे रद्द केला जाऊ शकतो. तसेच, ४ मीटरपर्यंतच्या छोट्या गाड्यांवर १८% जीएसटी कायम ठेवला जाईल, तर मोठ्या गाड्या ४०% जीएसटी स्लॅबमध्ये राहू शकतात.

## 'वनतारा' प्रकरणी SIT चौकशी; सुप्रीम कोर्टाचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६नवी दिल्ली**

गुजरातमधील वनतारा वन्यजीव केंद्र आणि प्राणी अधिग्रहण प्रकरणावरून सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी महत्त्वपूर्ण आदेश दिला आहे. न्यायालयाने या प्रकरणात विशेष तपास पथकाची (डखढ) नियुक्ती केली असून चौकशीचे नेतृत्व सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश जे. चेलमेश्वर करतील.




या डखढ मध्ये उत्तराखंड आणि तेलंगणा उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश राघवेंद्र चौहान, मुंबईचे माजी पोलिस आयुक्त हेमंत नागराळे आणि अनीश गुप्ता हे सदस्य असतील. न्यायमूर्ती पंकज मिथल आणि प्रसन्ना बी. वराळे यांच्या खंडपीठाने अधिवक्ता सी. आर. जया सुकिन यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने हा आदेश दिला.

**वन्यजीव संरक्षण कायद्याची होणार चौकशी**

गुजरातमधील जामनगर येथील वनतारा वन्यजीव केंद्र रिलायन्स फाउंडेशनद्वारे चालवले जाते. डखढ ला इतर गोष्टींबरोबरच भारत आणि परदेशातून प्राण्यांच्या, विशेषतः हत्तींच्या अधिग्रहणात वन्यजीव संरक्षण कायद्यातील तरतुदी आणि इतर संबंधित कायद्यांचे पालन केले जात आहे की नाही, याची चौकशी करावी लागेल.

## महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इच्छुकांनी साधली उत्सवाची संधी; कोणाला पावणार बाप्पा ....

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**



महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर होत असलेला गणेशोत्सव निवडणूक लढवू इच्छिणाऱ्यांच्या पथ्यावर पडला आहे. एकाच वेळी असंख्य मतदारांबरोबर संपर्क साधण्याची ही दांडगी संधी चुकू नये यासाठी बहुसंख्य इच्छुकांनी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी आपल्या थैल्या मोकळ्या सोडल्या आहेत. आर्थिक मदतीबरोबरच कार्यकर्त्यांना सर्व प्रकारचा आश्रय इच्छुकांकडून दिला जात आहे.

सलग तीन वर्षे महापालिकेची निवडणूकच झालेली नाही. दरम्यानच्या कालावधीत दोन ते तीन वेळा महापालिका निवडणूक होणार अशा वावड्या उठल्या. त्याही वेळी दिवाळी बरोबर अन्य सणांमध्ये इच्छुकांनी मतदारांसाठी फराळ वाटप, देवदर्शनाच्या सहली, मनोरंजनाचे जाहीर कार्यक्रम असा धुरळा उडवला. काहींनी जनसंपर्क कार्यालये सुरू केली. तिथे कार्यकर्त्यांबरोबरच मतदारांचीही बसण्या-उठण्याची व्यवस्था केली. मात्र त्यांचा खर्च झाला व महापालिका निवडणूक झालीच नाही. त्यामुळे इच्छुकांनी आपल्या थैल्यांची तोंडे आवळली होती. लोकसभा विधानसभा निवडणुकांमध्येही त्यांनी खर्चाला आवर घातला. काहींनी तर थेट व्यवसाय, उद्योग याकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. प्रभागामध्ये फिरण्याचा दिनक्रम तर बऱ्याच इच्छुकांनी बंदच करून टाकला.

**आता निवडणूक होणारच**

आता मात्र सर्वोच्च न्यायालयाचाच आदेश असल्याने महापालिका निवडणूक होणारच आहे, त्यामुळेच पुन्हा एकदा त्यांनी खर्च करण्यास सुरुवात केली आहे. त्यातच गणेशोत्सव आल्याने एकाच वेळी असंख्य मतदारांशी संपर्क करण्याची संधी म्हणून या उत्सवाकडे पाहिले जात आहे. परिसरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या कार्यकर्त्यांना भेटणे, त्यांची मागणी लक्षात घेणे, त्याप्रमाणे त्यांची व्यवस्था करणे असे प्रकार सुरू झाले आहेत. त्या बदल्यात मंडळ परिसरात छायाचित्रांसहित फ्लेक्स लावू देणे, कार्यक्रमांना प्रमुख उपस्थिती ठेवणे, मतदारांबरोबर ओळखी करून देणे अशा अपेक्षा ठेवल्या जात आहेत.

**मंडळांना उदार आश्रय**

बहुतेक इच्छुकांची त्यांच्या हक्काच्या परिसरात स्वत:ची सार्वजनिक मंडळे आहेतच, मात्र एका प्रभागात चार नगरसेवक निवडून द्यायचे असल्याने प्रभागाचे क्षेत्रफळ बरेच मोठे झाले आहे. मतदारांची संख्याही हजारच्या दरम्यान आहे. इतक्या मोठ्या क्षेत्रफळात संख्येने जास्त असलेल्या मतदारांबरोबर संपर्क साधायचा तर त्यासाठी उत्सवासारखी दुसरी संधी नाही हे ओळखूनच इच्छुकांनी ही मोर्चेबांधणी सुरू केली आहे. त्यामध्ये प्रमुख राजकीय पक्षांच्या इच्छुकांबरोबरच स्वतंत्र लढू इच्छिणाऱ्या तसेच लहान पक्षांकडून उमेदवारीची अपेक्षा करणाऱ्या इच्छुकांचा समावेश आहे. माजी नगरसेवकही त्यामध्ये आघाडीवर आहेत. त्यांच्या अर्थशक्तीसमोर कमी पडू नये यासाठी इच्छुकांनाही कंबर कसली आहे.

## गणेशोत्सवात अमरावतीत १३५० पोलीस, १४ सीआर मोबाईल तैनात

### सीसीटीव्ही, दामिनी पथके, ५०० होमगार्ड ही राहणार सज्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

उद्या दिनांक २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत अमरावती शहरात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. यंदा शहर कार्यक्षेत्रात ५४७ गणपती मूर्ती बसविण्यात येणार असून, त्यापैकी ४७१ गणपती मंडळांना ऑनलाईन 'एक खिडकी योजना'द्वारे परवानगी देण्यात आलेली आहे. उर्वरित मंडळांनी तातडीने परवानगी घेणे आवश्यक असून, विनापरवानगी स्थापना न करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या नेतृत्वाखाली अमरावती पोलीस दल सज्ज ठेवण्यात आले आहे. सोशल मिडियावर सतत देखरेख ठेवण्यासाठी सायबर पोलीस ठाण्याचे विशेष पथक कार्यरत राहणार असून, मिरवणूक मार्गांवर



सीसीटीव्ही व व्हिडिओग्राफीची व्यवस्था केली आहे. मिरवणुकीत ज्वलनशील पदार्थ, शस्त्रे, काठ्या, आक्षेपार्ह गाणी किंवा देखावे यांवर कडक बंदी घालण्यात आली आहे.

यावेळी सराईत गुन्हेगार, धार्मिक तेढ निर्माण करणारे समाजकंटक आणि जातीय दंगलीतील आरोपींवर प्रतिबंधात्मक कारवाईचे निर्देश सर्व पोलीस ठाण्यांना देण्यात आले आहेत. ३ पोलीस उपायुक्त, ३ सहायक पोलीस आयुक्त, ३० पोलीस निरीक्षक, ७० उपनिरीक्षक, १३५० अंमलदार, आरसीपी, क्युआरटी, १ एसआरपीएफ कंपनी, ५०० होमगार्ड (पुरुष व महिला) अशा मोठ्या फौजफाट्यासह शहरात कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

शहरातील महत्वाचे चौक, गर्दीची ठिकाणे व संवेदनशील भागात फिक्स पॉईंट, १४ सीआर मोबाईल, महिला सुरक्षेसाठी १० दामिनी पथके, तसेच वृद्ध व बालकांच्या सुरक्षेसाठी विशेष पथके तैनात राहणार आहेत. याशिवाय बीट मार्शल व डायल ११२ वाहने सतत गस्त घालणार आहेत.

अमरावतीकरांनी पूर्वीप्रमाणेच याही वेळी जातीय सलोखा व सामाजिक एकोप्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी केले आहे. तसेच सर्व नागरिकांना आगामी गणेशोत्सव आणि इतर धार्मिक सणानिमित्त त्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## जम्मूच्या डोडामध्ये ढगफुटी वैष्णोदेवी यात्रा स्थगित; ४ जणांचा मृत्यू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६जम्मू**

जम्मूच्या डोडा जिल्ह्यातील अनेक ठिकाणी ढगफुटीमुळे अचानक पूर आला. यामध्ये १० ते १५ घरे वाहून गेली. गेल्या २४ तासांत डोडा येथे ४ जणांचा मृत्यू झाला आहे. पुरात अनेक पादचारी पूलही वाहून गेले.

एका अधिकाऱ्याने सांगितले की, डोडा येथे घर कोसळल्याने दोन जणांचा मृत्यू झाला, तर सततच्या पावसामुळे आलेल्या पुरात दोघांचा मृत्यू झाला. पुरात निवासी क्षेत्रे आणि इतर मालमत्तेचे नुकसान झाले आहे. मदत आणि बचाव कार्य सुरू आहे.

जम्मू आणि काश्मीरमध्ये सततच्या पावसामुळे वैष्णोदेवी यात्राही थांबवण्यात आली आहे. राज्यात अनेक रस्ते आणि रेल्वे सेवा ठप्प आहेत. बटोटे-किश्तवार राष्ट्रीय महामार्ग (एनएच-२४४) देखील बंद करण्यात आला आहे, ज्यामुळे वाहनांची वाहतूक थांबली आहे.

यापूर्वी १४ ऑगस्ट रोजी किश्तवार जिल्ह्यातील चासोती गावात ढगफुटी झाली होती. यामध्ये ६५ जणांचा मृत्यू झाला होता, तर २०० जण अजूनही बेपत्ता आहेत. माचैल मातेच्या यात्रेसाठी आलेले अनेक भाविक, त्यांच्या बस, तंबू, लंगर आणि दुकाने ढगफुटीमुळे आलेल्या अचानक आलेल्या पुरात वाहून गेली.

## उच्च न्यायालयाकडून जरांगेंना धक्का, आंदोलनासाठी घ्यावी लागणार परवानगी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६मुंबई**

मराठा आरक्षणासाठी आग्रही असणारे, मराठा समाजाचे नेतृत्व करणारे मनोज जरांगे पाटील यांना मुंबई उच्च न्यायालयाने मोठा धक्का दिला आहे. कारण मनोज जरांगे हे येत्या २९ ऑगस्टपासून मुंबईतील आझाद मैदानात आंदोलन करणार आहेत. पण त्यांच्या या आंदोलनाला आता मुंबई उच्च न्यायालयाकडून परवानगी नाकारण्यात आली आहे. जरांगेंच्या या आंदोलनाला विरोध करणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. याच याचिकेवर आज मंगळवारी (ता. २६ ऑगस्ट) सुनावणी करण्यात आली. ज्यानंतर आता मुंबई उच्च न्यायालयाने जरांगेंना खडसावत त्यांच्या या आंदोलनाला परवानगी नसल्याचे स्पष्ट केले आहे. गणेशोत्सवामुळे मुंबई उच्च न्यायालयाकडून मनोज जरांगे यांना मुंबईमध्ये येण्यासाठी प्रतिबंध करण्यात आला आहे.



न्याय देवता आम्हालाही न्याय देईल. लोकशाही मार्गाने आंदोलन करणार आहे. सरकार जर अशी अडवणूक करत असतील लोकशाही बदलावी लागेल. न्याय देवता आम्हाला न्याय देईल, आमचेही वकील बांधव न्यायालयात जातील. आणि आम्ही २७ ऑगस्टला मुंबईला जाणार असा पवित्रा मनोज जरांगे यांनी घेतला आहे.

मनोज जरांगे यांच्या आंदोलनाविरोधात एक जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. तसेच वकील गुणरत्न सदावर्ते यांनीही या प्रकरणी एक याचिका दाखल केली होती. या दोन्ही याचिकांच्या माध्यमातून जरांगेंच्या आझाद मैदानावरील उपोषणाला विरोध करण्यात आला होता. सध्या सणासुदीचे दिवस आहेत. गणेशोत्सवामुळे मुंबईत मोठी गर्दी होणार आहे. त्यातच मनोज जरांगे यांनी आझाद मैदानावर उपोषण सुरू केले तर कायदा सुव्यवस्थेसह रहदारीचा मोठा प्रश्न उपस्थित होण्याची भीती आहे. त्यामुळे त्यांना मुंबईत येण्यास प्रतिबंध करण्यात यावा, अशी मागणी या याचिकांद्वारे करण्यात आली होती. त्यावर सुनावणी करताना हायकोर्टाने अधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय मुंबई शहरातील प्रमुख ठिकाणी निदर्शने करता येणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

**हायकोर्टाने दिला खारघर किंवा नवी मुंबईचा पर्याय**

अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय मुंबई शहरातील प्रमुख ठिकाणी निदर्शने करता येणार नाहीत. त्यामुळे मनोज जरांगे यांना उपोषण करण्यासाठी खारघर किंवा मुंबईसारखी पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याचा पर्याय महाराष्ट्र सरकारपुढे खुला आहे. मुंबईतील रहदारी विस्कळीत होऊ नये, या दष्टिकोनातून मुंबईतील आंदोलनाला परवानगी देऊ नये, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणी दिला आहे.

## संपादकीय ......

# उपराष्ट्रपती पदासाठी गर्जा महाराष्ट्र माझा ?

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन उपराष्ट्रपती होणार, हे जवळपास निश्चित आहे. महाराष्ट्राचे राज्यपालपद सांभाळत असताना उपराष्ट्रपती पदावर शंकरदयाळ शर्मा निवडून आले होते. ते पुढे राष्ट्रपतीही झाले. राधाकृष्णन यांना पुढे कशी संधी मिळेल, ते कालांतराने समजेल. आताचा मोलाचा प्रश्न आहे, तो राधाकृष्णन यांचे मताधिक्य किती असेल हा! महाराष्ट्राला उमेदवारी मिळाली आहे; पण पाठीदार मतदारांची संख्या महाराष्ट्रातच कमी, अशी स्थिती आहे. ही स्थिती बदलेल काय, हा कमालीच्या औत्सुक्याचा विषय आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मतांची संख्या वाढवण्याचे प्रयत्न सुरू केले असणार, हे उघड आहे. त्यांच्यापेक्षाही मते वाढवण्याची जास्त गरज आहे, ती अजित पवार आणि एकनाथ शिंदे या दोन उपमुख्यमंत्र्यांना! अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला विधानसभेच्या निवडणुकीत प्रचंड यश मिळाले. त्यांचे ४१ आमदार निवडून आले. लोकसभेत केवळ १ खासदार आणि पाठोपाठ झालेल्या विधानसभेत दमदार कामगिरी. मूळ पक्ष स्थापन केला त्या शरद पवार यांच्या मतावर विश्वास असलेले खासदार ८, त्यातील काहींना आता एक व्हावे, सत्ताधार्यांच्या वळचणीला जावे, असे वाटतेय. अजित पवार यांचे नेतृत्व मानावे, अशीही इच्छा आडून व्यक्त होत असल्याची चर्चा रंगत आहे .

अजित पवार यातील काही मते फोडू शकतील का? उपराष्ट्रपती पदासाठी मतदान गुप्त असते. मत कुणाला जाईल, ते कळत नसते. खासदारांना जर निष्ठा बदलायच्या असतील, तर अशी गुप्त मतदानाची संधी साधली जाते. लोकसभा आणि राज्यसभा दोन्ही सभागृहातील सदस्य मतदानास पात्र असतात. सरकारला दिली जाणारी ही बहुमत सिद्ध करायची संधी असते. ती धनखड यांच्या राजीनाम्यामुळे चालत आली आहे.

धनखड जेव्हा उपराष्ट्रपती झाले, तेव्हा भाजपकडचे बहुमत मोठे होते. मताधिक्य प्रचंड होते. काँग्रेसने रिंगणात दाखल केलेल्या मार्गारेट अल्वा यांना त्यावेळी मिळालेल्या मतांपेक्षा यावेळी बी. सुदर्शन रेड्डी यांना मिळणारी मते जास्त असतील. आज सरकारला समर्थन देणारी सदस्य संख्या ४२३ आहे, तर विरोधकांची संख्या ३५९. सत्तापक्षाला असलेली आघाडी आज केवळ ६४ मतांची आहे. ती वाढवणे, हे यावेळचे उद्दिष्ट असेल. तेलगू देसम सरकारचा भाग आहे. सुदर्शन रेड्डी हे तेलुगू म्हणून त्यांना चंद्राबाबू नायडू यांची मते मिळतील, अशी स्थिती सत्ताधार्यांच्या दृष्टीने नाही. मते कमी होणार नाहीत, वाढवायची आहेत. ती कुठून वाढतील हा सध्याचा विषय आहे. त्यात महत्त्वाची भूमिका एकनाथ शिंदे बजावू शकतील किंबहुना ते तशी भूमिका बजावण्याच्या तयारीत आहेत, असे सांगितले जाते.

शरद पवार यांच्याकडे अमर काळे, भास्कर भांगरे, अमोल कोल्हे, नीलेश लंके, बजरंग सोनावणे, धैर्यशील मोहिते-पाटील आणि सुप्रियाताई सुळे असे आठ लोकसभा सदस्य, तर फौजिया खान आणि स्वत: शरद पवार अशी दोन म्हणजे एकूण दहा मते आहेत. शरद पवार यांनी आम्ही राधाकृष्णन यांना मतदान करणार नाही, असे स्पष्ट केले आहे. देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातील मतदार असलेली व्यक्ती उपराष्ट्रपती होतेय म्हणून मतदान करा, असे निवेदन जाहीरपणे केले आहे. ते शरद पवार यांनी नाकारले आहे. आता प्रश्न राहिला उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाचा. ठाकरे यांचे जनतेतून निवडून आलेले खासदार आहेत ९ आणि राज्यसभेतील सदस्य दोन आहेत, ते खासदार संजय राऊत आणि प्रियंका चतुर्वेदी. ११ मते कुठे जातील, हा विषय महत्त्वाचा आहे.

या पूर्वी शिवसेनेने बाळासाहेब ठाकरे यांच्या काळात महाराष्ट्र कन्या म्हणून प्रतिभाताई पाटील यांना पाठिंबा दिला होता. प्रणव मुखर्जी यांच्याबाबतही भूमिका घेतली होती. त्या वेळी युतीत असताना भाजपच्या विरोधात मतदान झाले, यावेळी महाराष्ट्राचा सन्मान होण्यासाठी ही मते अधिकृतरीत्या वळवण्याची भूमिका उद्धव ठाकरे जाहीर करतील काय, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष आहे. तसे झाले तर ते फार मोठे पाऊल मानले जाईल. तसे झाले नाही, तर एकनाथ शिंदे यांना पुन्हा एकदा त्यांचा करिश्मा सिद्ध करण्याची संधी मिळेल. आपण किती मते पलटवू शकतो, यावर दिल्लीतील शिंदे यांचे मोठेपण वाढेल. शिंदे दिल्लीत अन्य प्रादेशिक पक्षात कमालीचे लोकप्रिय असणारे नेते आहेत. काही खासदार त्यांच्यामुळे भूमिका बदलणार, ही चर्चा आहे. ती खरी ठरवणार्या हालचाली पडद्यामागे सुरू आहेत काय? शिंदे यांच्यासाठी ही लढाई जिंकणे अतिशय महत्त्वाचे आहे.

सध्या भारतीय जनता पक्षाला समर्थन देणार्या दोन महत्त्वाच्या पक्षांत खालोखाल शिंदे यांचा क्रमांक तिसरा आहे. तेलगू देशम आणि संयुक्त जनता दल याच्या पाठोपाठ शिंदे यांचे दिल्लीत महत्त्व आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे शिंदे यांचे महत्त्व जाणतात. त्यांना वेळोवेळी महत्त्वही देतात. या दोघांनाही केंद्रातील आपली सत्ता मजबूत आहे, असा संदेश उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीच्या निमित्ताने द्यायचा आहे, त्यामुळेच शिंदे यांनी वेळोवेळी जी भूमिका घेत हात मजबूत केले आहेत, ती आता पुढे नेण्याची ही वेळ आहे. एकनाथ शिंदे यांना स्वतःचा करिष्मा दाखवण्यासाठी ही चालत आलेली संधी असल्याचे त्यांचे काही समर्थक सांगतात. त्यामुळे सध्या शांतता असली तरी उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीच्या निमित्ताने पडद्यामागे भरपूर हालचाली सुरू आहेत. त्या हालचालींचा लाभ घेत स्वतःचे महत्त्व वाढवणे आणि पक्षाला केंद्रस्थानी आणणे यावर शिंदे यांना भर द्यायचा आहे, ते त्यासाठी काय करताहेत, हे दिसेल. सत्ताधारी पक्ष दिल्लीत नेरेटिव्हची लढाई लढतो आहे.

# आपले सरकार पोर्टलच्या माध्यमातून देणाऱ्या सेवा आता व्हॉट्सप च्या माध्यमातून द्याव्यात

## सर्व शासकीय सेवा नागरिकांना सोयीनुसार उपलब्ध होण्यासाठी प्रत्येक तालुक्यात रिंग तयार करा – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ मुंबई** – राज्य शासनाच्या विविध विभागांकडून नागरिकांना सेवा पुरवल्या जातात. या सेवांसाठी आपले सरकार हे पोर्टल असून या पोर्टलवरील सर्व सेवा व्हॉट्सअँप च्या माध्यमातून पुरवण्यात याव्यात. तसेच सर्व सेवा योग्य प्रकारे आणि गरजे नुसार पुरवण्याच्या दृष्टीने सर्व तालुक्यांमध्ये एक रिंग तयार करण्यात यावे, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

वर्षा निवासस्थानी सेवा सुलभीकरणासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी आज राज्यातील नागरिक सेवांचा आढावा घेण्यासाठी बैठक घेतली. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी या सूचना दिल्या.

बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या एकाच प्रकारच्या ९ सेवा एकत्र करण्याच्या सूचना देऊन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सेवा पुरवठ्याच्या गुणवत्तेची खात्री करण्यासाठी त्रयस्थ संस्थेमार्फत नियमितपणे पडताळणी करण्यात यावी, तसेच अर्ज प्रक्रियेत लागणारी कागदपत्रांची संख्या लक्षणीयरीत्या कमी करण्यासाठी नियोजन करावे. सर्व जिल्हा परिषद, महापालिका आणि विद्यापीठांचे डॅशबोर्ड एकसमान असावेत, जेणेकरून राज्यभरातील नागरिकांना एकसंध अनुभव मिळेल, या सेवेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी रिंग व क्लस्टर प्रणाली राबवण्यात यावे. रिंगमध्ये सुरवातीस त्या तालुक्यातील १० ते १२ गावांचं समावेश असावा व गरजेनुसार सेवा पुरवण्यात याव्यात. या रिंगच्या व्यवस्थापनासाठी स्वतंत्र गट व व्यवस्थापन टीम तयार करावी. तसेच सेवा पुरवण्यासाठी डिश डिजिटल सेवा हबचा वापर करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.


मुख्य सचिव राजेश कुमार यांनी सेवा वितरणात अपीलची सुविधा उपलब्ध करून देण्याचे आणि प्रमाणपत्र वितरणासाठी मल्टी-मॉडेल प्रणाली (जसे की ईमेल, पोर्टल, व्हॉट्सॲप) वापरण्याच्या सूचना केल्या.आपले सरकार पोर्टलच्या माध्यमातून साध्य राज्यात १००१ सेवा पुरवण्याचे काम सुरू असून त्या पैकी ९९७ सर्व पोर्टल वर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. गेल्या पंधरा दिवसा मध्ये पोर्टलवर उपलब्ध असलेल्या सेवांमध्ये २३६ सेवांची वाढ झाली आहे.

यावेळी राज्य सेवा हक्क आयोगाचे आयुक्त मनुकुमार श्रीवास्तव, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगरानी, अपर मुख्य सचिव (नियोजन) राजगोपाल देवरा, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, माहिती तंत्रदक्यान विभागाचे प्रधान सचिव पराग जैन नैनुटीया, महा आयटी चे व्यवस्थापकीय संचालक संजय काटकर आदी मान्यवर उपस्थित होते.




## जंक फूड डोळ्यांसाठीही घातक, मुलांना जंक फूड देणे पूर्णतः चुकीचे

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक**
आजकाल लहान मुले असोत किंवा मोठी माणसे, घरचे पौष्टिक अन्न सोडून बर्गर, पिझ्झा, चिप्स, कोल्डड्रिंक्स, केक, वेपर्स यांसारख्या जंक फूडकडे जास्त आकर्षित होत आहेत. जंक फूडचे जास्त सेवन पचनाशी संबंधित अनेक समस्यांना कारणीभूत ठरते, ही गोष्ट बहुतेक लोकांना माहीत असते; पण जास्त प्रमाणात जंक फूड खाल्ल्याने मुलांच्या डोळ्यांना हानी पोहोचू शकते आणि त्यांच्या डोळ्यांची दृष्टीसुद्धा कमी होऊ शकते. मुळातच बौद्धिक, शारीरिक विकासासाठीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर असणार्या मुलांना जंक फूड देणे पूर्णतः चुकीचे आणि अनारोग्यदायी आहे.



डोळ्यांचा विचार करता, जंक फूडमध्ये डोळ्यांसाठी आवश्यक असणारे व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ई, ओमेगा-३ फॅटी ॲसिड आणि झिंक यांसारखे पोषक घटक जवळजवळ नसतात. असे अन्न वारंवार खाल्ल्याने मुलांच्या डोळ्यांच्या पेशींना आवश्यक पोषण मिळत नाही. त्यामुळे डोळ्यांमध्ये कोरडेपणा येणे, धूसर दिसणे, जळजळ होणे, कमी प्रकाशात दिसण्याची क्षमता घटणे अशा समस्या सुरू होतात.

ओमेगा-३ फॅटी ॲसिड आणि व्हिटॅमिन एची कमतरता झाल्यास रेटिनाच्या पेशी कमकुवत होऊ लागतात. ही पोषणतूट दीर्घकाळ कायम राहिली, तर डोळ्यांच्या नसांमध्ये नुकसान होऊ शकते आणि त्यामुळे अंधत्वाचा धोका निर्माण होतो.

मुलांच्या डोळ्यांचे आरोग्य टिकवण्यासाठी त्यांच्या आहारात गाजर, पालक, दूध, अंडी, अक्रोड आणि मासे यांसारख्या पदार्थांचा समावेश करणे गरजेचे आहे. संतुलित आहार आणि निरोगी जीवनशैली स्वीकारल्यास डोळ्यांची दृष्टी कमी होण्यापासून मोठ्या प्रमाणात बचाव करता येतो. याशिवाय डोळ्यांची नियमित तपासणी डोळ्यांच्या डॉक्टरांकडून करून घेणे आणि तज्ज्ञ नेत्ररोगतज्ज्ञांच्या सल्ल्याने डोळ्यांचे व्यायाम करणे उपयुक्त ठरते.

# मोसंबी-संत्रा पिकाला कीटकांचा धोका; जाणून घ्या उपाययोजना

कृषी विशेष

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक**
संत्रा व मोसंबी बागायतदारांसाठी धोक्याची घंटा वाजली आहे. रस शोषणारा पतंग या फळांना छिद्र करून त्यातील रस काढून घेतो आणि फळे विक्रीस अयोग्य करतो.

या कीटकामुळे उत्पादनात मोठी घट होत असून शेतकरी चिंतेत आहेत. मात्र योग्य उपाययोजना करून या कीटकाचा प्रादुर्भाव या कीटकामुळे उत्पादनात मोठी घट होत असून शेतकरी चिंतेत आहेत. मात्र योग्य उपाययोजना करून या कीटकाचा प्रादुर्भाव आटोक्यात आणता येऊ शकतो.आटोक्यात आणता येऊ शकतो.

संत्रा व मोसंबी ही महाराष्ट्रातील प्रमुख फळपिके आहेत. या पिकांना विविध प्रकारचे कीड-रोगांचा प्रादुर्भाव होत असतो. त्यामध्ये फळातील रस शोषणारा पतंग (ऋींळीं डींलज्ञळपस चेींह) हा एक महत्त्वाचा कीडशत्रू आहे. या पतंगामुळे फळांचे मोठे नुकसान होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते.

नुकसानाची लक्षणे

हा पतंग मोसंबी व संत्रा फळांना छिद्र करून त्यातील रस शोषून घेतो.

अशा फळांवर तपकिरी डाग दिसतात व रस निघाल्यानंतर फळ कोमेजून जाते.

रस शोषल्याने फळांमध्ये कुज येते व फळ बाजारात विक्रीस अयोग्य बनते.

फळांची चव, रंग व वजन यावर थेट परिणाम होतो.





शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
शाडू मातीच्या आकर्षक गणेश मूर्ति विक्रीसाठी उपलब्ध
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०


पडलेली फळे त्वरित जमा करून जमिनीत पुरावीत.

वासरवेल, चांदवेल आदी वेलवर्गीय पिके बागेतून काढून टाकावीत.

फवारणी व फळांचे संरक्षण

संध्याकाळी बागेत धूर करावा, त्यामुळे पतंग तेल (१० मिली/लिटर पाणी) फवारावे.

प्रकाश सापळे

बागेमध्ये प्रकाश सापळे लावावेत. प्रकाशाकडे आकर्षित झालेले पतंग पकडून नष्ट करावेत.

रासायनिक उपाय

मलेथिऑन (१०० मिली) + गुर (१०० ग्रॅम) + फळांचा रस (१०० मिली) प्रति लिटर पाण्यात मिसळून आमिष तयार करावे.

हे आमिष झाडामध्ये भांड्यात ठेवून पतंगांना आकर्षित करून नष्ट करता येते.

शेतकऱ्यांसाठी संदेश

फळांचे नुकसान टाळण्यासाठी पतंगाचा प्रादुर्भाव आढळताच एकात्मिक व्यवस्थापन करणे अत्यावश्यक आहे. जैविक उपाय, नीम तेल फवारणी, प्रकाश सापळे व रासायनिक आमिष या सर्वांचा एकत्रित वापर करून फळांचे रक्षण केल्यास चांगले उत्पादन व गुणवत्ता राखता येते.

**(सौजन्य : फलोत्पादन पिकावरील किड रोग सर्वेक्षण, सल्ला व व्यवस्थापन प्रकल्प (हॉर्टसॅप), किटकशास्त्र विभाग, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी)**

# विद्यापीठात श्रीचक्रधर स्वामी अवतार दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती –** बाराव्या शतकातील तत्वज्ञ व समाजसुधारक तसेच महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधर स्वामी अवतार दिनानिमित्त संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील महानुभाव अध्यासन केंद्रात अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी विद्यापीठाच्यावतीने श्रीचक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन अभिवादन केले. अभिवादन कार्यक्रमाला विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य



डॉ.व्ही.एम. मेटकर, डॉ. नितीन चांगोले, मानव विज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. मोना चिमोटे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, रासेयो संचालक डॉ. निलेश कडू, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील, उपअभियंता (विद्युत) श्री राजेश एडले, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, विद्यापीठ अधिसभा सदस्य श्री अमोल ठाकरे, महानुभाव अध्यासन केंद्र प्रमुख डॉ. महंत सोनपेठकर, श्री सुभाष पावडे, श्री अशोक धाबे, ॲड. अरुण ठाकरे तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी मोठए संख्येने उपस्थित होते. संचालन व श्रीचक्रधर स्वामी यांच्याबद्दल माहिती डॉ. महंत सोनपेठकर यांनी दिली.

# दहीहांडा मार्गाचे होत आहे कायापालट, गावांना मिळणार नवी जीवनरेखा

## एम एस आय डी सी चा नाविन्यपूर्ण प्रकल्प

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती–**
महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत (एमएसआयडीसी) विदर्भात सुरू असलेल्या रस्तेबांधणीच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत अकोला-अकोट मार्गावरील दहीहांडा टी पॉइंट ते दहीहांडा गावापर्यंतच्या दोन पदरी सिमेंट रस्त्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. या रस्त्यामुळे दर्यापूर-शेगाव प्रवास कमी होऊन वेळ वाचणार असून, किनखेड, कीलिवेली, न्यू फेलिवेली, काटी, पाटी, दहीहांडा आदी गावांचा महामार्गाशी थेट संपर्क येणार आहे.अकोल्यापासून २५ किमी अंतरावर असलेल्या दहीहांडा टी पॉइंटपासून गावापर्यंतचे १६ किमी अंतर एमएसआयडीसी कडून मजबुतीकरण तंत्राने विकसित केले जात आहे. डिसेंबर २०२४ मध्ये सुरू झालेले हे काम मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. ७ मीटर रुंदीचा हा रस्ता दोन्ही बाजूला १.५ मीटर बाजूसह बांधला जात आहे.विशेष म्हणजे, दहीहांडा गावाजवळील ७०० मीटर रस्ता दुप्पट म्हणजेच १४ मीटर रुंद केला जात आहे, जेणेकरून वाहतुकीची सोय, सुरक्षा आणि वेग यांचा समन्वय साधला जाईल. यासोबतच पावसाळ्यात पाण्याचा निचरा सुरळीत व्हावा यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना २.५ किमी लांबीचे काँक्रीट ड्रेन बांधले जात आहेत. ग्रामस्थांच्या अपेक्षांनुसार या प्रकल्पामुळे वाहतूक व्यवस्था सुधारेल, प्रवासात वेळेची बचत होईल तसेच रोजगार व व्यवसायाच्या संधीही वाढतील. दर्यापूर, अमरावती, अंजनगाव सुर्जी ते शेगाव या मार्गाने जाणाऱ्या वाहनांसाठी हा रस्ता थेट शॉर्टकट ठरणार आहे.उच्च दर्जाचे आधुनिक तंत्रज्ञान वापरून उभारला जाणारा हा रस्ता विदर्भातील ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाला गती देणारा ठरेल, असा विश्वास स्थानिकांमध्ये व्यक्त होत आहे.




आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. २६ ऑगस्ट २०२५ शहर/ग्रामिण

# हनुमानगडी : अध्यात्म, पर्यटन आणि विकासाचा संगम

## मुख्यमंत्री व पालक मंत्र्यांच्या पुढाकाराने प्रकल्पाला गती

## १५१ फूट उंच हनुमानमूर्ती, रोपवे, भक्तनिवास, योगसाधना केंद्र अशा भव्य योजनांचा आराखडा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती :**
राज्याचे उपमुख्यमंत्री व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली अमरावतीजवळील हनुमानगडी पर्यटन प्रकल्प आकार घेत आहे. आमदार रवी राणा यांच्या प्रमुख उपस्थितीत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दोन तास प्रत्यक्ष पाहणी करून नियोजन सादर केले.

या पाहणीस विभागीय आयुक्त शेता सिंगल, जिल्हाधिकारी डॉ. आशिष येरेकर, मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता, उपवनसंरक्षक अर्जुन, उपविभागीय अधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी भटकर, पर्यटन व्यवस्थापक विजय अवधाने यांच्यासह सर्व विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.





### महत्त्वाचे प्रस्ताव :

- १५१ फूट उंच भव्य हनुमान मूर्ती
- भक्तनिवास, संत निवास व योग साधना केंद्र
- छत्री तलाव ते हनुमानगडी रोपवे सुविधा
- खुला रंगमंच, म्युझिकल फाउंटन व लेझर शो
- अमृत कुंड, यज्ञशाळा व आध्यात्मिक पर्यटन केंद्र
- पिण्याच्या पाण्याची टाकी, स्वच्छतागृह, पानपोई
- काँक्रीट रस्ते, नाली, वॉल कंपाऊंड व आधुनिक बाग
- वाहनतळ व पार्किंग सुविधा



### प्रकल्पाचा उद्देश :

माळेगाव (सर्वे नं. २४) येथील हनुमानगडी परिसराला राज्यस्तरीय अध्यात्मिक पर्यटन केंद्र म्हणून विकसित करणे, हा शासनाचा उद्देश आहे. अध्यात्म, पर्यटन आणि पर्यावरण संवर्धनाचा संगम साधत अमरावती जिल्ह्याला सांस्कृतिक व धार्मिक पर्यटनाचे नवे रूप प्राप्त होणार आहे.

अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या प्रेझेंटेशनमधील काही बाबींवर चर्चा करून आवश्यक सुधारणा सुचवण्यात आल्या.युवा स्वाभिमान पक्षाचे सुनील राणा, चंद्रकुमार जाजोदिया, उमेश ढोणे, डोलेंद्र पाटील, विजय खंडेलवाल, कुंदन यादव, हर्षल रेवने, नितीन मस्के, रोहन शर्मा, श्रीकांत इंगळे, अर्चित जाजोदिया, विनय तन्ना, कमलेश करिया, राहुल बजाज, अनिकेत जोशी, महेश मूलचांदाणी आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.हनुमानगडी लवकरच 'अध्यात्म व पर्यटनाचा केंद्रबिंदू' ठरणार असून, शासनाच्या सक्रिय पुढाकारामुळे अमरावती जिल्ह्याला विकासाची नवी दिशा मिळणार आहे.

# गृहराज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्याकडून चांदूर रेल्वे नवीन पोलिस ठाण्याची पाहणी

## जीम, स्विमींग पुल बांधण्याच्या सूचना



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती,**
गृहराज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी आज चांदूर रेल्वे येथील पोलिस ठाण्याला भेट दिली. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील पोलिस ठाण्याची माहिती घेतली. त्यानंतर बांधकाम सुरू असलेल्या नवीन पोलिस ठाण्याची पाहणी केली.यावेळी आमदार प्रताप अडसड, जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद, उपविभागीय अधिकारी तेजस्वीनी कोरे आदी उपस्थित होते.गृहराज्यमंत्री डॉ. भोयर यांनी सुरवातीला चांदूर रेल्वे पोलिस ठाण्याला भेट दिली. यावेळी त्यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांच्याकडून जिल्ह्यातील पोलिस ठाण्याच्या इमारतींची माहिती घेतील. त्यांनी जिल्ह्यातील पोलिस ठाण्यांच्या इमारतीचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. याला मंजुरी मिळताच तातडीने कामे पूर्ण करण्यात येतील, असे सांगितले. यानंतर डॉ. भोयर यांनी बांधकाम सुरू असलेल्या पोलिस ठाण्याची पाहणी केली. बांधकाम गतीने पूर्ण करावेत, तसेच चांगल्या दर्जाचे काम करण्याच्या सूचना दिल्या. नोव्हेंबरपर्यंत काम पूर्ण करण्याचे लक्ष असल्याची माहिती देण्यात आली. तालुक्यातील इतरही इमारतींचे कामे पूर्ण करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. आसेगाव पुर्णा, चांदूर रेल्वे आणि बेनोडा या तीन नवीन पोलिस ठाण्याच्या इमारतीसाठी १२ कोटी रूपयांचा निधी देण्यात आला आहे. हे काम नोव्हेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. प्रत्येक पोलिस ठाण्याचे सुमारे १ हजार चौरस मीटरचे बांधकाम होणार आहे. तळमजला आणि पहिला मजला सुविधांसह बांधकाम करण्यात येणार आहे. पोलिस ठाण्याचे करण्यात येणारे बांधकाम चांगल्या प्रतीचे करावे, अशा सूचना डॉ. भोयर यांनी केल्या. तसेच चांदूर रेल्वे येथे नागरिकांच्या सोयीसाठी उत्कृष्ठ प्रतिचा स्विमिंग पूल आणि जीम प्रस्तावित करावा. यासाठीचा प्रस्ताव तातडीने सादर करावा. या स्विमिंग पूल आणि जीमची देखभाल, दुरूस्ती पोलिस विभागाने करावे. यामुळे या सुविधा सुव्यवस्थित राहण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# शिवरायांचा छावा समूह नाट्य अमरावतीत २९ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर पर्यंत

## श्री. अष्टविनायक गणपती महोत्सव समितीचे भव्य आयोजन




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती–** छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवन कार्यावर आधारित महाराष्ट्र भर तुफान गाजत असलेले समूह नाट्य शिवरायांचा छावा अमरावती मधील श्री. संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात दिनांक २९ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर २०२५ पर्यंत दररोज सायंकाळी ६ वा. सादरीकरण करण्यात येणार असल्याची माहिती हॉटेल प्रेस इन येथील पत्रकार परिषदे मध्ये आयोजन समितीचे अध्यक्ष नानासाहेब बोके व समिती पदाधिकारी यांनी दिली. सदर बहुचर्चीत छावा समूह नाट्यचे उदघाटन राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. चंद्रशेखर बावनकुळे यांचे हस्ते होईल. याप्रसंगी, प्रमुख अतिथी म्हणून आमदार प्रवीण तायडे. आ. राजेशा वानखडे, रविराज देशमुख, सुदर्शन गांग आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. महाराज शंभु छत्रपती प्रोडक्शन पुणे निर्मित शिवरायांचा छावा पा नाटकाचे लेखक, दिग्दर्शक आणि निर्माते शिवशंभुशाहीर श्रीमंत महेंद्रराजे वसंतराव महाडिक असून राज्यात सदर नाटकाला श्रोत्यांचा प्रचंड प्रतिसाद प्राप्त होत आहे. भव्य रंगमंच, मराठे व मोगल यांच्या तलवारीच्या खणखणाटात, तोफांच्या गडगडाटात व अनिच्या वर्षावात घनघोर रणसंग्राम, विद्युत रोषणाई, भव्य राज्यभिषेक सोहळा १२ फूट जहाजाचा वापर करून अंगावर रोमांच उभे करणारी शंभू छत्रपतीची किल्ले जंजिरा मोहीम, शिवशंभुप्रेमी कलाकारांचा संच, खटकेबाज संवाद ही छावाची वैशिष्ट्ये आहेत.

शहर व जिल्ह्यातील रसिक वर्गानी आवर्जून छावा समूह नाट्य सह परिवार पहावे असे आवाहन आयोजन समितीचे अध्यक्ष नानासाहेब बोके, उपाध्यक्ष दिलीप निंभोरकर, सिद्धार्थ वानखडे, प्रकाश घाटे, कार्याध्यक्ष हरीश मोहोड, जे. बी. सदार, निमंत्रक सुरेखा तुंगारे, जगदीश गोवर्धन, प्रशांत विधे, आशि देशमुख, नितीन टाले, रोशन पडोळे, कांचन उल्हे, वैशाली विधाते. मनोहर कडू, मोहन पावडे, रोशन पडोले, देवशताल आठवले. अमोल इंगळे, अभिनंदन पेंढारी, युवा संवाद प्रतिष्ठानचे नितीन पवित्रकार शिवराज टेकाडे, अतुल गोळे, सोपान गुढचे, रघुवीर देशमुख ऍड. प्रभाकर वानखडे आदींनी केले आहे अधिक माहिती व तिकीटा साठी जिल्हा उद्योग केंद्र अमरावती समोरील आनंद पॅलेस येथे संपर्क साधावा.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदतीची मागणी

## शिवसेनेचा तहसील कार्यालयावर मोर्चा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६नांदगाव खंडेश्वर :** – तालुक्यात गेल्या दोन आठवड्यांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शेतात तलावसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे.

यामुळे सोयाबीन, कापूस व तूर पिकांचे अतोनात नुकसान झाले असून शेतकरी हवालदिल झाले आहेत. या पार्श्वभूमीवर शिवसेना (ठाकरे गट) तर्फे तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

जिल्हाप्रमुख मनोज कडू, प्रकाश मारोटकर व बाळासाहेब राणे यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात आला. शेकडो शेतकरी व शिवसैनिकांच्या उपस्थितीत तहसीलदारांना घेराव घालून निवेदन सादर करण्यात आले. आंदोलनकर्त्यांनी यावेळी मुख्यमंत्री फडणवीस मुर्दाबाद अशा घोषणाबाजी करून शासनाविरोधात तीव्र रोष व्यक्त केला.शासनाने तातडीने मागण्या मान्य न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.मोर्चात दिलीप देवतळे, मनोहर सावंत, पंकज पिंपळकर, अक्षय राणे, निलेश इखार, गुणवन्त चांदूरकर, रवी ठाकूर, गजानन गावंडे, विजय सुने, गोपाल बनकर, सुरेंद्र गावाफळे, लीलाधर चौधरी, लोकेश उटबगले यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक व शेतकरी सहभागी झाले होते.

आंदोलनकर्त्यांच्या प्रमुख मागण्यातालुक्यातील शेतकऱ्यांचे तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी.

खरीप हंगाम २०२४ साठी मंजूर असलेला पिक विमा शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावा.

मे महिन्यातील अवकाळी पावसाची मदत अद्याप न मिळाल्याने ती तातडीने वितरित करावी.

अवकाळी पावसाच्या मदतीच्या यादीतून वगळलेल्या शेतकऱ्यांचा समावेश करून त्यांनाही नुकसान भरपाई द्यावी.

निराधार योजनेचा लाभ मागील सहा महिन्यांपासून थांबलेला असून तातडीने लाभार्थ्यांना निधी द्यावा.

शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी जाहीर करावी.

# निराधार योजनेच्या लाभार्थ्यांच्या आंदोलनाने दणाणले तहसिल कार्यालय

## चांदूर रेल्वे शहरातून टांगाव्दारे शेकडो लाभार्थी पोहचले तहसिल कार्यालयात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६चांदूर रेल्वे –** चांदूर रेल्वे शहरासह तालुक्यातील अनेक लाभार्थ्यांचे संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना व अपंग व्यक्तींना योजनेचे गेल्या ७-८ महिन्यांपासून मासिक मानधन खात्यावर जमा न झाल्यामुळे आम आदमी पक्ष, शिवसेना (ठाकरे गट), भारतीय कम्युनिष्ट पक्ष, जनता दल (से.), मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष या पक्षातर्फे २५ ऑगस्ट रोजी माजी न.प. उपाध्यक्ष नितीन गवळी यांच्या नेतृत्वात मोर्चा काढण्यात आला. या आंदोलनामुळे लाभार्थी मोठ्या प्रमाणात तहसिल कार्यालयात एकवटले होते. यामुळे कार्यालय परिसर घोषणांनी दणाणून गेला होता. चांदूर रेल्वे शहरासह तालुक्यातील अनेक लाभार्थी संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना व अपंग व्यक्तींसाठीची मासिक मानधन योजना अंतर्गत नोंदणीकृत आहेत. मात्र, गेल्या ७-८ महिन्यांपासून या योजनेचे मासिक मानधन अनेक लाभार्थ्यांच्या



खात्यावर जमा झालेले नाही. यामुळे लाभार्थ्यांना मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. संबंधित विभागाशी पाठपुरावा करून गोरगरिब लाभार्थ्यांचे थकीत मानधन तातडीने मंजूर करून द्यावे अशी मागणी तहसिलदार पुजा माटोडे यांना मंगळवारी दिलेल्या निवेदनातून करण्यात आली होती. मात्र तरीही लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे मानधन न मिळाल्याने लाभार्थ्यांसह सोमवारी तहसिल कार्यालयात बैठा सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. मोर्चामध्ये भजने सुध्दा म्हणण्यात आले. टांगाव्दारे मोर्चा लाभार्थ्यांना घेऊन तहसिल कार्यालयात पोहचला होता. यानंतर याठिकाणी बैठा सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. अखेर तहसिलदार पुजा माटोडे यांच्यासोबत झालेल्या यशस्वी चर्चा व लेखी पत्रानंतर सदर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले. आंदोलकांनी प्रशासनाला १ ऑक्टोंबर पर्यंतचा वेळ दिला आहे. तरीही लाभार्थ्यांना मानधन न मिळाल्यास २ ऑक्टोंबर (गांधी जयंती) रोजी तहसिल कार्यालयात यापेक्षा तिव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला आहे. यावेळी प्रा. वसंतरावं ढोके, विलास वाडे, मनोज कडू, नितीन गवळी, बंडूभाऊ यादव, गजानन यादव, कॉ. सतिष चौधरी, ऍड. शिवाजी देशमुख, कॉम्रेड शाहीर धम्मा खडसे, प्रभाकर भगत, मेहमुद हुसैन, कॉ. रामदास कारमोरे, प्रा. प्रसेन्नजित तेलंग, राजाभाऊ भैसे, भुषण नाचवणकर, महादेवराव शेंद्रे, विनोद लहाणे, संजय डगवार, भिमराव खलाटे, संजय चौधरी, राजेंद्र हेरोड, ज्ञानेश्वर भोगे, विनोद सुरटकर, प्रभाकर यावले, यांसह शेकडो लाभार्थी सहभागी झाले होते.

आंदोलकांच्या मागणीनुसार झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने तहसिल कार्यालयात संजय गांधी, श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांकरीता स्वतंत्र मदत कक्षाची स्थापना केलेली आहे. लाभार्थ्यांचे आधार कार्ड सिडींग करणे, बँकेशी लिंक करणे या करीता बँकेच्या सभेचे आयोजन करण्यात येत आहे. तसेच ७-८ महिन्यांपासून जे अनुदान मिळाले नाही त्याबाबत वरीष्ठ कार्यालयाशी वेळोवेळी पाठपुरावा करुन ते तातडीने मिळेल यासाठी प्रयत्न करण्यात येईल. **पुजा माटोडेतहसिलदार, चांदूर रेल्वे.**

# गरीब मराठ्यांना मूर्ख बनवू नका

## निवडणुकीतील पाठिंब्यावरून आंबेडकरांची जरांगेंवर टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६मुंबई–** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे मराठा आरक्षणासाठी येत्या २९ ऑगस्ट रोजी पुन्हा एकदा मुंबई गाठणार आहेत. याचपार्श्वभूमीवर त्याचे दौरे सुरू असून ते मराठा समाजाला मोठ्या संख्येने मुंबईत येण्याचे आवाहन करताना दिसत आहेत. पण गरीब मराठ्यांना आरक्षणापासून वंचित ठेवणाऱ्या श्रीमंत मराठ्यांना तुम्ही पाठिंबा देत आहात. त्यामुळे गरीब मराठ्यांना मूर्ख बनवू नका, असे म्हणत वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी टीका केली आहे.

प्रकाश आंबेडकर यांनी ट्वीट करताना म्हटले की, मनोज जरांगे पाटील तुम्ही मराठ्यांच्या आरक्षणासाठी सरकारविरुद्ध लढत आहात. पण, सरकारमध्ये कोण आहे?



आताच्या सरकारमध्ये एकनाथ शिंदे, अजित पवार, राधाकृष्ण विखे पाटील, अशोक चव्हाण, नारायण राणे सारखे प्रस्थापित मराठा आहेत. तर अडीच वर्षांपूर्वी महाविकास आघाडीचे सरकार असताना सत्तेत सर्व प्रस्थापित मराठा होते. जसे की, शरद पवार, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, जयंत पाटील, बाळासाहेब थोरात हे सर्व प्रस्थापित मराठे सत्तेत होते, अशी आठवण आंबेडकर यांनी करून दिली आहे.

प्रकाश आंबेडकर म्हणाले की, तुम्ही (मनोज जरांगे) निवडणुकीत या श्रीमंत मराठ्यांचा प्रचार केला आणि त्यांना मतदान केले. मात्र तुम्ही गरीब मराठ्यांसाठी आंदोलन करत असताना दुसरीकडे आरक्षणापासून त्यांना वंचित ठेवणाऱ्या श्रीमंत मराठ्यांना तुम्ही पाठिंबा देत आहात. असे करून तुम्ही गरीब मराठ्यांना मूर्ख बनवू नका. कारण लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत तुम्ही श्रीमंत मराठ्यांना पाठिंबा दिला होता. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत तुम्ही पुन्हा तीच भूमिका घ्याल आणि गरीब मराठ्यांना मूर्ख बनवाल का? असा रोखठोक प्रश्न प्रकाश आंबेडकर यांनी मनोज जरांगे यांना विचारला आहे.

# भंडाऱ्याचे पालकमंत्री बदल; संजय सावकारेंचे डिमोशन झाले

## पंकज भोयर यांच्याकडे भंडाऱ्याची जबाबदारी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६भंडारा–** महायुती सरकारकडून भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री बदलण्यात आले आहेत. संजय सावकारे यांच्या जागी आता पंकज भोयर यांच्याकडे भंडाऱ्याचे पालकत्व देण्यात आले आहे. मंत्री संजय सावकारे यांचे डिमोशन का करण्यात आले? याबाबतची सध्या कोणतेही कारण समोर आले नाही. संजय सावकारे यांच्यावर आता बुलढाणा जिल्ह्याचे सहपालकमंत्री म्हणून जबाबदारी



सोपवण्यात आली आहे.

राज्याचे वस्त्र उद्योगमंत्री संजय सावकारे यांच्याकडून भंडारा जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी काढून घेण्यात आली आहे. उपसचिव दिलीप देशपांडे यांनी सोमवारी रात्री याबाबतचे पत्र जाहीर केले होते. सावकारे यांच्याजागी पंकज भोयर यांना भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. मागील काही दिवसांपासून सावकारे भंडाऱ्याचे पालकमंत्री होते, पण झेंडामंत्री म्हणून त्यांच्यावर ठपका ठेवण्यात आला होता. फक्त १५ ऑगस्ट अथवा २६ जानेवारी या काळातच सावकारे भंडाऱ्यात येत असल्याचा आरोप करण्यात येत होता.

भंडारा जिल्ह्यातील कोणत्याही समस्या, आढावा बैठकीसाठी फक्त हजेरी लावली जायची. भंडारा अथवा परिसरातील पालकमंत्री हवा, अशी नागरिकांची मागणी होती. त्यामुळेच सावकारे यांची उलचबांगडी केली असावी असा अंदाज बांधला जातोय. पंकज भोयर हे भंडाऱ्याच्या जवळच्या वर्धा जिल्ह्यातील आहेत. त्यांना भंडारा जिल्ह्याची जाण मोठ्या प्रमाणात असू शकते. आगामी नगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत, त्यावर पकड मजबूत करण्यासाठी भोयर यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे का? अशी चर्चा आहे.

# शाळांच्या संचमान्यतेसाठी आधार क्रमांकाची अट रद्द करा- शिक्षक संघटनांची मागणी

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२६अमरावती–** यंदा शाळांना 'सरल' आणि 'युडायस प्लस' या दोन्ही पोर्टलवरील माहिती वेगवेगळी न भरता ती 'युडायस प्लस' या एकाच पोर्टलवर भरावी लागणार असून या पोर्टलवर भरलेल्या माहितीच्या आधारे संचमान्यता करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. त्यानुसार ३० सप्टेंबरपर्यंत पटावर नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांपैकी आधार क्रमांक वैध असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेऊनच संचमान्यता करण्यात येणार आहे.यासंदर्भात प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे, राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांना निवेदन सादर केले आहे. शाळांमध्ये प्रविष्ट विद्यार्थ्यांची सत्यता पडताळणी आवश्यक आहे. याबाबत दुमत नाही. मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळेत येणारे काही विद्यार्थी हे आर्थिक दृष्ट्या कमजोर घटकांसह मजुरीसाठी वारंवार स्थलांतर करणाऱ्या आणि भटक्या समाजातील असतात. त्यांच्या आधार कार्ड वरील नोंदी अनेकदा अचूक नसतात. काही वेळा जन्मतारखेच्या दाखल्याअभावी पाल्याचे आधार कार्ड सुद्धा निघत नाही.

आधार कार्ड वरील नोंदी दुरुस्त करण्याचा सतत आग्रह धरला तरी पालक त्यांच्या दैनंदिन वैयक्तिक अडचणीमुळे तयार नसतात.असे विद्यार्थी प्रत्यक्ष शाळेत प्रविष्ट असले तरी आधार कार्ड व्हॅलिडेशन होत नसल्याने सदर विद्यार्थी संच मान्यतेसाठी ग्राह्य धरल्या जात नाही. मात्र शालेय पोषण आहार, विविध शिष्यवृत्ती आणि मोफत गणवेश अशा सर्व योजनांसाठी आधार कार्ड व्हॅलिडेशन नसणारे विद्यार्थी पात्र असतात. केवळ संच मान्यतेसाठी अशा विद्यार्थ्यांना ग्राह्य धरल्या जात नसल्याने पुरेशी पटसंख्या असूनही आवश्यकतेपेक्षा कमी संख्येने शिक्षक पदे मंजूर होतात, अशी माहिती प्राथमिक शिक्षक समितीने आपल्या निवेदनात दिली आहे.खोटी पटसंख्या दाखविण्याचे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना कोणतेही कारण नाही. मात्र प्रविष्ट विद्यार्थी संख्येची खात्री करायची असल्यास स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांची पर्यवेक्षकीय यंत्रणेमार्फत प्रत्यक्ष पट पडताळणी करणे सहज शक्य आहे, असे शिक्षक समितीचे म्हणणे आहे.

१५ मार्च २०२४ च्या संच मान्यता शासन निर्णयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांचे अस्तित्व संपुष्टात येण्याची भीती निर्माण झालेली आहे. सदर शासन निर्णय रद्द करण्यासह आधार कार्ड आधारित संच मान्यता हा प्रकार बंद करून पर्यवेक्षकीय यंत्रणेमार्फत पट पडताळणी करणे आवश्यक आहे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने केली असल्याचे प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी सांगितले.

### गॅस ग्राहकांची लूट उघडकीस आल्यानंतर

# भारत गॅस एजन्सीने दिले एका ग्राहकाला १५ रुपये परत!

## मात्र अजूनही अनेकांना न्याय बाकी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२६वरुड–** भारत गॅस एजन्सी कडून ग्राहकांची लूट - सिलेंडर मागे घेतात १५ रुपये जास्त या मथळ्याखाली बातमी प्रसिद्ध होताच भारत गॅस एजन्सीच्या हालचालींना वेग आला. ग्राहक भूपेश अलोणे यांच्यासह काहींना एजन्सीने त्वरित १५ रुपये परत केले असल्याचे समोर आले.

मात्र ही लूट फक्त एका–दोन ग्राहकांपुरती मर्यादित नसून, असे शेकडो ग्राहक आहेत ज्यांच्याकडून सिलेंडर मागे १५ रुपये जादा वसूल करण्यात आले होते. त्यामुळे केवळ ज्यांनी आवाज उठवला त्यांनाच पैसे परत न करता, सर्व प्रभावित ग्राहकांना परतावा द्यावा, अशी जोरदार मागणी सर्वसामान्य जनतेतून होत आहे.स्थानिक नागरिकांच्या मते, ही कृती सरळसरळ ग्राहकांची फसवणूक असून अशा प्रकारच्या वसुलीवर तातडीने नियंत्रण ठेवले नाही तर पुढे पुन्हा सामान्य जनता लुटली जाईल.दरम्यान या संदर्भात प्रशासनाकडे तक्रारी दाखल झाल्या तर. एजन्सीने सर्व ग्राहकांना योग्य तो परतावा द्यावा, या संदर्भात संबंधित विभागाने चौकशी करून कायदेशीर कारवाई केली जावी, अशी माहिती पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी जाहीर करावी.गॅस वितरणासारख्या आवश्यक सेवेत होत असलेली ही अनधिकृत वसुली प्रशासनाने गांभीर्याने घेऊन, पुढील काही दिवसांत एजन्सीची तपासणी करावी अशी मागणी भारत गॅस एजन्सीच्या ग्राहकाकडून केल्या जात आहे.ग्राहकांची अपेक्षा स्पष्ट, दररोज तालुक्यात ८०० ते ९०० सिलेंडर विकल्या जातात त्या सर्वांनाच त्यांचे १५ रुपये प्रमाणे परत मिळाले पाहिजेत. याकडे सुद्धा पुरवठा विभाग लक्ष देणार का असाही प्रश्न निर्माण झाला आहे?–

# गणेशोत्सवाच्या पूर्वसंध्येला या जिल्ह्यांना सतर्कतेचा इशारा

### राज्यातील अनेक जिल्ह्यात आज पावसाचा येलो अलर्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६नागपूर : –** बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार होत असून राज्यातील अनेक जिल्ह्यात आज पावसाचा येलो अलर्ट दिला आहे. पूर्व विदर्भासह उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, कोकण आणि घाटमाथ्यावर जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. राज्यातील १७ जिल्ह्यांना येलो अलर्ट दिला असून उर्वरीत जिल्ह्यात ढगाळ हवामानासह हलक्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

मोसमी पावसासाठी पोषक हवामान तयार होत असून, कोकण, घाटमाथा आणि मध्य महाराष्ट्रात, विदर्भात हलक्या ते जोरदार पावसाच्या सरी पडत आहेत. सोमवारी राजधानी मुंबईत जोरदार पाऊस पडला, तर उर्वरित ठिकाणी दिवसभर ढगाळ हवामानासह पावसाच्या सरीमागून सरी सुरूच होत्या. आजही कोकणातील पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये, तसेच पुणे घाटमाथा, सातारा जिल्ह्यांच्या घाटमाथ्यावर जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. तसेच उत्तर महाराष्ट्रातील नंदूरबार, धुळे, जळगाव, मराठवाड्यातील हिंगोली, नांदेड, पूर्व विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यांत विजांसह



पावसाचा अंदाज असल्याने सतर्कतेचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. उर्वरित राज्यात अंशतः ढगाळ हवामानासह हलक्या पावसाची शक्यता कायम आहे. गणरायाच्या आगमनापूर्वीच राज्यात पावसाची जोरदार हजेरी दिसून येत आहे. राज्यात कोकणात मुसळधार, तर उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भात जोरदार पावसाची शक्यता आहे. मंगळवारी राज्यातील तब्बल १७ जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

मराठवाड्यातील हिंगोली आणि नांदेड या जिल्ह्याला हवामान विभागाने यलो अलर्ट दिला आहे. तर उर्वरित छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, लातूर, परभणी या जिल्ह्यात मध्यम पावसाची शक्यता आहे. पूर्व विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया आणि गडचिरोली या पाच जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. या पाचही जिल्ह्यांमध्ये विजांसह जोरदार पावसाची शक्यता आहे तर उर्वरित जिल्ह्यांमध्ये हलका ते मध्यम पाऊस होऊ शकतो.

# 'ऑपरेशन विजय ते ऑपरेशन सिंदूर'चा देखावा

## सोमेश्वर गणेशोत्सव मंडळ दाखवणार सैन्य दलामधील जवानांचा इतिहास

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अमरावती**

लोकसेवक सोमेश्वर पुसतकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ स्थापन करण्यात आलेल्या साई नगरातील सोमेश्वर गणेशोत्सव मंडळाने यंदा गणेशोत्सवातून 'ऑपरेशन विजय ते ऑपरेशन सिंदूर'ची मांडणी करण्याचे ठरवले आहे. मंडळाचे अध्यक्ष ज्येष्ठ नाट्यकर्मी विशाल तराळ यांनी सोमवारी ही माहिती दिली. त्यासाठी सैन्य दलातील निवृत्त अधिकारी मदतीला आले असून त्यांच्या संकल्पनेतून २० मिनिटांची दृकश्राव्य चित्रफीत तयार केली.

सोमेश्वर पुसतकर यांच्या प्रेरणेतून विशाल तराळ, विशाल ठाकरे, मनीष शिवणकर, सुदेश कचवे, महेश श्रीखंडकर, रोहित तन्ना, सूरज कोठाळे, उमेश पाथरकर, मोरेश्वर द्राव्येकर, दिनेश खापर्डे यांनी एकत्र येऊन साई नगरातील साई हेरिटेजमध्ये सोमेश्वर गणेशोत्सव मंडळ स्थापन केले. या गणेशोत्सवाचे यंदाचे ५ वे वर्ष आहे. आतापर्यंत सोमेश्वर गणेशोत्सव मंडळाने वेगवेगळ्या संकल्पनेतून जय जवान, जय किसान, एकच राजा छत्रपती शिवाजी महाराज, श्रीराम गणेश हा उत्सव साजरा केला आहे. या वर्षी 'भारतीय सैनिकांचा गौरव' हा माजी सैनिकांच्या सहभागातून विशेष देखावा साकारणार आहे.

साईनगर परिसरातील कर्नल अनंत प्रभाकर संगवई यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ व भारतीय सैनिकांच्या सन्मानार्थ 'ऑपरेशन




विजय ते ऑपरेशन सिंदूर' ही संकल्पना त्यात समाविष्ट केली आहे. जवानांच्या संघर्षमय जीवनाची जाणीव आणि देशभक्तीचा संदेश देण्याचा प्रबोधनात्मक आणि भावनिक दृष्ट्या स्पर्श करणारी चित्रफीत तयार केली आहे. या उपक्रमासाठी माजी सैनिकांचे मार्गदर्शन लाभले आहे.

गणेशभक्तांनी या प्रेरणादायी देखाव्याला भेट देऊन जवानांचा सन्मान वाढवण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. या वेळी विशाल तराळ, दिनेश खापर्डे, कार्तिक सामदेकर, माजी सैनिक सूरज कोठाळे, दिलीप मोहोड, रमेश तराळ, विजय बांबल, प्रकाश बहाळे, नायक रौराळे आदी उपस्थित होते. प्रसार माध्यमांना माहिती देताना मंडळाचे अध्यक्ष ज्येष्ठ नाट्यकर्मी विशाल तराळ. बाजूला उपस्थित सैन्यदलातील निवृत्त अधिकारी.

लोकमान्य टिळकांच्या गणेशोत्सवातही अमरावती लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी १८९३ मध्ये सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली. पुण्याच्या विंचुरकर वाडा येथे हा गणेशोत्सव साजरा झाला. त्यावेळी त्यांच्यासोबत अमरावतीचे दादासाहेब खापर्डे, स्वत: विंचुरकर आणि अन्य मान्यवर उपस्थित होते. त्यानंतर काही वर्षांनी टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला सुरुवात केली. या वेळीही दादासाहेब खापर्डे व इतरांच्या माध्यमातून अमरावती त्यांच्या सोबत होती.

# बुलडाण्यात पर्यावरणपूरक गणपतीची मागणी; बाप्पाच्या मूर्तीच्या किंमतीत पाच टक्क्यांनी घट

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६बुलढाणा–**

बुलडाणा जिल्ह्यावर सध्या गणेशोत्सवाचा फिवर चढत असल्याचे चित्र आहे. मागील आठ दिवसापासून जागोजागी गणेश मंडळांच्या वतीने मंडप उभारणी, सजावट व आरासचे काम सुरु आहे. तर दुसरीकडे यंदा किमती मध्ये पाच टक्क्यांनी घट आल्याने यंदा ही जिल्ह्यात पर्यावरण पुरक गणपतीची मागणी असल्याची माहिती आहे.

गणेशोत्सवाच्या प्रारंभापासूनचे जिल्हाभरात विविध संघटनेच्यावतीने, पर्यावरण बचाओ समितीच्या वतीने अनेक शाळेत उपक्रम राबवून लहान मुलांना पर्यावरणाचे महत्व व पर्यावरण पुरक गणपती मूर्तीचे महत्व पटवून दिले जात आहे. काही मूर्ति–कारांनी तर शंभर टक्के नैसर्गिक रंगांचा वापर करत कल्पक आणि पारंपरिक गणेशमूर्ती साकारल्या आहेत. परिणामी, अशा मूर्तींना मागणी वाढल्याने स्पर्धा निर्माण झाली आहे, याच स्पर्धेचा परिणाम म्हणून किंमतीत सुमारे ५ टक्क्यांची घट झाल्याची माहिती मूर्ती विक्रेत्यांकडून समजते. शाडू मातीचे गणपती हे पाच इंचापासून ते ६ फुटापर्यंत असल्याने त्यांना घरापर्यंत नेण्यास कोणत्याही प्रकारची अडचण जात नाही. परंतू ज्या मूर्तीची उंची १५ फुटांपेक्षा जास्त असणार आहे, त्यांना वाहनात बसवून मंडळा पर्यत नेण्यासाठी मंडळांना अनेक प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागणार आहे.

दोन किमी अंतर कापण्यासाठी या वाहनांना अनेक तास लागणार असल्याने पालिका, पोलिस प्रशासनाच्या वतीने सदर भागात ट्राफिक जाम होणार नाही याची काळजी घेतली जात आहे. शहरात सध्या जयस्तंभ चौक, रेणुका मंगल कार्यालय, बाजार लाईन, जनता चौक, आदी परिसरात मोठया प्रमाणात गणपती विक्रीचे स्टॉल सजलेले आहे. बुलडाण्यात यंदा गणेशोत्सवासाठी खास प्रसिद्ध असलेल्या पेण येथील शाडू मातीच्या गणपती मूर्ती



बुलडाण्यात उपलब्ध झाल्या आहेत. रेणुका मंगल कार्यालयात शुभारंभ गणेश मूर्ती दालन या ठिकाणी गणपतीच्या मूर्तींचे प्रदर्शन व विक्री साठी उपलब्ध करण्यात आल्या आहेत. येथे ग्राहकांची गर्दी ही होत असल्याची माहिती आहे.

संकल्पनात्मक सजावटीचा ट्रेंड शहरातील अनेक गणेश मंडळांनी यंदा 'थीम बेस्ड' आरास व सजावटीचा प्राधान्य दिलं आहे. 'स्वच्छता अभियान', 'प्लास्टिक मुक्ती', 'जलसंवर्धन', 'शेतकरी आणि आत्मनिर्भर भारत' यासारख्या सामाजिक विषयांवर आधारित देखावे तयार केले जात आहेत. काही मंडळांनी पारंपरिक ग्रामसंस्कृती, पुराणकथा व पौराणिक दृश्यांना ही साकारण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे या वर्षीचा गणेशोत्सव केवळ उत्सवापुरता न राहता, जनजागृतीची माध्यम बनला आहे.

पर्यावरणपूरक गणपतीला मागणी जिल्ह्यात हळूहळू पर्यावरण पुरक गणपतीची मागणी वाढत चालली आहे, त्यामुळे आम्ही यंदा मूर्तीची संख्या वाढवली आहे. यावर्षी मातीच्या गणपतीच्या किमतीमध्ये पाच ते दहा टक्के घट झाल्या आहेत. त्यामुळे पर्यावरण पूरक गणपतीच्या मूर्तींना चांगली मागणी आहे.

# पोरगव्हाण-धामणगाव रस्त्यावरील पूल धोकादायक अवस्थेत

## अपघाताचा धोका वाढला



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ मोर्शी**

मोर्शी तालुक्यातील पोरगव्हाण-धामणगाव रस्त्यावरील पूल खचल्यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण झाला असून तो अपघाताला निमंत्रण देत आहे.

या पुलावरून गेल्या वर्षी विष्णोरा येथील हरिदास लोखंडे हे व्यक्ती दुचाकीसह वाहून गेले होते. तेव्हा सुदैवाने जीव वाचला होता. मात्र, त्यानंतरही प्रशासनाने या पुलाच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष केले असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.दररोज या रस्त्याने अमरावती-विष्णोरा बस वाहतूक होते. खचलेल्या पुलामुळे वाहनचालकांना कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः पावसाळ्यात पुलावरून पाणी वाहत असल्याने वाहनचालकांना धोका अधिक वाढतो. कधीही मोठा अपघात घडू शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे.विद्यार्थ्यांना शाळेत जाण्या-येण्यासाठीसुद्धा या रस्त्यावरून प्रवास करावा लागत असल्याने पालकांमध्ये चिंता वाढली आहे. आणखी पाऊस पडल्यास दोन्ही गावांचा संपर्क पूर्णतः तुटण्याची शक्यता ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.गावकऱ्यांचे म्हणणे आहे की, ङ्गपूल अर्धा खचल्यामुळे गंभीर अपघात होण्याची शक्यता प्रबळ आहे. प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष द्यावे, अन्यथा आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल.

# रेल्वे उड्डाणपुल वाहतुकीसाठी बंद कडेकोट पोलीस बंदोबस्त

## नागरिकांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

राजकमल व जयस्तंभ चौकातून रेल्वे स्टेशन आणि हमालपुऱ्याकडे जाणाऱ्या १९६३ साली बांधलेल्या रेल्वे उड्डाणपुलावर सोमवार, २५ ऑगस्ट २०२५ पासून सर्व प्रकारच्या वाहनांची वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आली आहे. पुलाच्या जर्जर अवस्थेमुळे हा निर्णय घेण्यात आला असून, या संदर्भातील तातडीची अधिसूचना वाहतूक विभागातर्फे जारी करण्यात आली आहे.





याआधी २४ जुलैपासून केवळ जड वाहनांची वाहतूक बंद होती. दुचाकी, ऑटो व कार यांना पुलावरून मार्ग देण्यात येत होता. मात्र, स्ट्रक्चरल ऑडिट अहवालानुसार पुलावरील स्टील गडर्सना जंग लागणे, डेक स्लॅबमध्ये क्रॅकिंग, गळती यांसारख्या गंभीर उणिवा आढळल्याने अखेर संपूर्ण वाहतूक थांबवावी लागली.वाहतूक बंदीचे उल्लंघन होऊ नये म्हणून पुलाच्या चारही बाजूंना बॅरिकेड्स उभारण्यात आले असून, पोलीसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात आहे. दरम्यान, वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पर्यायी मार्ग निश्चित करण्यात आले आहेत.या संदर्भात अधिक माहिती देताना सहाय्यक पोलीस आयुक्त (शहर वाहतूक शाखा) संजय खताळे यांनी नागरिकांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन केले.

**उद्या बाप्पालाही नाहक त्रास**

उद्याला आपल्या लाडक्या बाप्पाच आगमन होणार आहे या बंद असलेल्या पुलावरून दरवर्षी शेकडो गणेश मंडळाच्या शोभायात्रा जात असतात मात्र या वर्षी पूल हा वाहतुकीसाठी बंद असल्याने बाप्पाला ही याचा नाहक त्रास सहन करावा लागणार आहे.

# गेट परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

आयआयटी अभियांत्रिकी पदवीधरअभियोग्यता चाचणी (गेट) २०२६ कडे सर्वांचे लक्ष लागले होते. त्या अनुषंगाने या परीक्षेसाठी २५ ऑगस्टपासून नोंदणी सुरू झाली आहे. परीक्षा फेब्रुवारी २०२६ मध्ये तर निकाल मार्चमध्ये जाहीर होणार आहे.बीई, बी टेक, बी. एससी, बी. फार्म, बी आर्च, किंवा समकक्ष अभ्यासक्रमाचे शेवटचे वर्ष किंवा पदवीधर विद्यार्थी या परीक्षेच्या पात्रतेनंतर गेट आयआयटीच्या एम. टेक पद्व्युत्तरसाठी प्रवेश तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमात (पीएसयू) भरतीची संधी मिळते. गेट परीक्षेसाठी २५ ऑगस्ट ते २५ सप्टेंबरपर्यंत नोंदणी करता येईल. तसेच या परीक्षेचे शुल्क २५ सप्टेंबरपर्यंत जमा बा करायचे आहे. ही परीक्षा ७,८, व १४, १५ फेब्रुवारी २०२६ रोजी घेतली जाणार आहे.

# महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेसाठी अर्ज सादर करण्यास २६ तारखेपर्यंत मुदतवाढ

## सांस्कृतिक कार्यमंत्र्यांची घोषणा

महागणेशोत्सव
महाराष्ट्राचा राज्य उत्सव

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६मुंबई**

राज्य शासनाच्यावतीने या वर्षीपासून महाराष्ट्रातील गणेशोत्सव हा 'महाराष्ट्राचा राज्य उत्सव' म्हणून साजरा करण्यात येत आहे. या राज्य उत्सवाअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२५' च्या अर्ज सादर करण्याच्या अंतिम तारखेस मुदतवाढ देण्यात आल्याची घोषणा राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ड. आशिष शेलार यांनी केली. या स्पर्धेत अधिकाधिक मंडळांना सहभागी होता यावे, यासाठी आता अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख मंगळवार दि. २६ ऑगस्ट २०२५ असेल.या स्पर्धेचे अर्ज hrt{t://ganerhortav.dmka.bo.in या संकेतस्थळावर उपलब्ध ऑनलाइन पोर्टलद्वारे स्वीकारले जाणार आहेत. या स्पर्धेत अधिकाधिक मंडळांनी सहभागी होऊन तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय पारितोषिके जिंकण्याचा लाभ घ्यावा असे आवाहन राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ड. आशिष शेलार यांनी केले आहे.

# मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत जिल्ह्यात भातकुली आणि नारगावंडी सौर प्रकल्प कार्यान्वित

## या प्रकल्पातून ३३५० शेतकऱ्यांना दिवसा वीज



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ अमरावती**

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजने अंतर्गत जिल्ह्यात अमरावती ग्रामिण विभागातील नारगावंडी (५ मेगावॅट) आणि भातकूली (४ मेगावॅट) ही विकेंद्रीत स्वरूपाची दोन सौर प्रकल्प कार्यान्वित करण्यात आल्याने परिसरातील ३ हजार ३५० शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळणार असल्याने शेतकऱ्यात आनंदाचे वातावरण आहे.

शेतकऱ्यांना दिवसा आणि शाश्वत वीज पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत राज्यात १६ हजार मेगावॅट वीज निर्मिती करण्यात येत आहे.त्यापैकी जिल्ह्यात ९० उपकेंद्रासाठी विकेंद्रीत स्वरूपाचे सौर प्रकल्प उभारून ३२८ मेगावॅट वीज निर्मिती करण्यात येत आहे.नारगावंडी येथे उभारण्यात आलेले सौर प्रकल्प हे ५ मेगावॅट क्षमतेचे असून २५ एकर शासकीय जमिनीवर उभारण्यात आला आहे. मे. पुरुषोत्तम प्रोफाईल्स या विकासकाकडून उभारण्यात आलेल्या या सौर प्रकल्पामुळे ३३ केव्ही नारगावंडी उपकेंद्राअंतर्गत वीज पुरवठा होत असलेल्या २३०० शेतकऱ्यांना दिवसा विजेच्या स्वरूपात या प्रकल्पाचा लाभ मिळणार आहे. तसेच ४ मेगावॅट क्षमता असलेल्या भातकूली सौर प्रकल्प हे २० एकर शासकीय जमिनीवर उभारण्यात आले असून या प्रकल्पामुळे परिसरातील १०५० शेतकऱ्यांना दिवसा विजेचा मार्ग मोकळा झाला असून मे. रविंद्र एनर्जी या विकासकाकडून हे प्रकल्प उभारण्यात आले आहे.

यापूर्वी जिल्ह्यात उसळगव्हाण (३ मे.वॅ), मंगरूळ दस्तगीर (३ मे.वॅ), माहुली जहांगीर (५ मे.वॅ), क्षमतेचे ३ सौर प्रकल्प सुरू झाले आहे. त्यामुळे जिल्ह्यात आता एकुण २० मेगावॅट क्षमतेचे ५ सौर प्रकल्प कार्यान्वित झाले असून ८५५० शेतकऱ्यांना याचा लाभ मिळायला सुरूवात झाली आहे.

# तिवसा येथे तालुकास्तरीय रानभाजी महोत्सव- २०२५ उत्साहात संपन्न





**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६तिवसा**

कृषी विभाग, आत्मा विभाग, उमेद प्रकल्प व पंचायत समिती तिवसा यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २५ ऑगस्ट २०२५ रोजी पंचायत समिती सभागृह, तिवसा येथे तालुकास्तरीय रानभाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी मा. श्री. नारायण अमझरे यांच्या हस्ते झाले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तिवसा तालुका कृषी अधिकारी मा.कु.हेमलता इंगळे होत्या. तज्ञ मार्गदर्शक म्हणून प्रगतशील शेतकरी श्री.निखिल तेटू यांनी रानभाजीचे आहारातील महत्त्व व आहार आणि पोषणमूल्य याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. रानभाजी ओळख बाबत जनजागृती केली. रानभाजी महोत्सवात शेतर्क?यांनी रानभाजी स्टॉलला भेट देऊन माहिती मिळवली. उमेद प्रकल्पातील कृषी सखी, मंडळ कृषी अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी, उप कृषी अधिकारी तसेच पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहिले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. निलेश जवंजाळ, उपकृषी अधिकारी यांनी केले. प्रास्ताविक व आभार प्रदर्शन श्री. सचिन हरले, बीटीएम आत्मा यांनी केले. नियोजनात श्री. हरीश फरकाळे, श्री. स्वप्निल रोहनकर (उमेद प्रकल्प) व श्री. प्रतीक राऊत (एटीएम आत्मा) यांचे योगदान लाभले.

# धामणगाव विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्षाला अटक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६चांदूर रेल्वे**

कबड्डीपटू युवतीच्या आत्महत्याप्रकरणी धामणगाव विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष संदीप शेंडे यांना पोलिसांनी तिवसा येथून अटक केली आहे.युवक काँग्रेसचा धामणगाव विधानसभा अध्यक्ष संदीप प्रभु शेंडे याने कबड्डीपटू युवतीला आमिष दिले की, कबड्डीमध्ये तुझं करिअर घडवून देतो, त्या बदल्यात माझ्याशी शारीरिक संबंध ठेव, अन्यथा तुला बरबाद करतो, असे सांगून कबड्डीपटू युवतीला सतत मानसिक त्रास दिला. तिने नकार दिल्यानंतर तिला सतत फोन करून मानसिक त्रास देत राहिला. एवढंच नव्हे तर तिचे लग्न जुळल्यानंतर तिच्या नवऱ्याला तीचे चारित्र्य चांगले नाही, असे फोनवर सांगून तिचे लग्न मौडले. त्यामुळे मानसिक तणावात आलेल्या कबड्डीपटू छकुली सुरेश पिटेकर (१९) हिने ३१ जुलै रोजी सालईदाभा ता. हिंगणा जि. नागपूर येथील राहत्या घरी विषारी पावडर प्राशन करून आत्महत्या केली. याप्रकरणी नागपूर पोलिसांनी चांदूर रेल्वे रहिवाशी युवक काँग्रेसचे धामणगाव विधानसभा अध्यक्ष संदीप प्रभु शेंडे यांच्यावर बीएनएस २०२३ कलम १०८ व कलम ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल करून तिवसा येथून त्याला अटक केली.

# कृत्रिम हौद, मूर्तीदान व जाहिरातींतून होणारे गणेशाचे विडंबन थांबवावे - हिंदु जनजागृती समितीची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

गणेशोत्सव हा कोट्यवधी हिंदूंच्या श्रद्धा, भक्ती व सांस्कृतिक एकात्मतेचा उत्सव असून राज्य शासनाने यावर्षी त्याला राज्य महोत्सवाचा दर्जा दिला आहे. तरीदेखील काही ठिकाणी महापालिका किंवा नगरपालिका घनकचरा गाड्यांद्वारे गणेशमूर्ती विसर्जन, मूर्ती दान मागवून कृत्रिम हौदात टाकणे व त्यानंतर अवशेष तुडवले जाणे, तसेच जाहिरातींसाठी गणेशमूर्तींचा विकृत वापर केला जात असल्याने धार्मिक भावना दुखावल्या जात आहेत.या सर्व प्रकारांवर तातडीने बंदी घालावी, यासाठी हिंदु जनजागृती समितीने आज जिलाधिकारी आशिष येरेकर व महापालिका आयुक्त सौम्या शर्मा यांना निवेदन दिले.या वेळी योग वेदांत समितीचे मानव बुद्धदेव, मंदिर महासंघाचे कैलाश पनपालीया, भाजपाचे तुषार वानखेडे, समितीचे सचिन वैद्य, प्रदिप गर्गे, रोशन मुळे, भूषण दलाल, सनातन संस्थेच्या विभा चौधरी, डॉ. रमेश वरुडकर, संजय चौधरी आदींसह अनेक धर्मप्रेमी उपस्थित होते.निवेदनात म्हटले आहे की, काही कंपन्या गुटखा, तंबाखू, दारू, ऑनलाईन जुगार यांच्या जाहिरातींसाठी गणेशाचा वापर करतात, हे उत्सवाच्या पवित्रतेला कलंक लावणारे आहे. विसर्जन प्रक्रियेतही मूर्तींचा कचरा गाड्यांतून वाहतूक करून खाड्यांत टाकला जातो किंवा कृत्रिम हौदात विसर्जनानंतर मूर्तींचे अवशेष कामगारांच्या पायाखाली तुडवले जातात, हा गंभीर अपमान आहे.

**समितीच्या मागण्या :**

गणेशमूर्तींचा जाहिराती वा विडंबनात्मक स्वरूपात वापर पूर्णतः बंद करावा. विसर्जनासाठी कचरा गाड्या व कृत्रिम हौदांचा वापर थांबवून वाहत्या पाण्याची स्वच्छ व्यवस्था करावी. मूर्ती दान मागण्याची प्रथा कायमस्वरूपी बंद करावी. 'भगवान श्रीगणेशाचा सन्मान राखा' या आशयाची राज्यव्यापी जनजागृती मोहीम हाती घ्यावी.

# दीपशिखा गुरुकुल सैनिक स्कूलमध्ये निकृष्ट जेवण; मुख्याध्यापक म्हणतात...ऑल इज वेल

## विद्यार्थ्यांनी व्हिडिओ व्हायरल केला



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६चिखलदरा**

जिल्ह्यात नावाजलेली दीपशिखा गुरुकुल सैनिक स्कूल पुन्हा एकदा वादात आली आहे. पालकांनी असा आरोप केला आहे की, शाळेच्या मेसमध्ये दिले जाणारे जेवण निकृष्ट दर्जाचे आहे ज्यामुळे मुलांची तब्येत बिघडली आणि अनेक विद्यार्थ्यांना विषबाधेचा त्रास सहन करावा लागला आहे

पालकांचे म्हणणे आहे की, लाखोरुपये फी आकारूनही शाळा प्रशासन मुलांच्या आरोग्याशी खेळ करत आहे. तक्रारदार पालकांनी हादेखील आरोप केला आहे की मेस चालक आणि शाळा प्रशासन यांच्यात संगनमत असल्यामुळे अन्नाच्या गुणवतेकडे लक्ष दिले जात नाही.फी आणि प्रतिष्ठेच्या नावाने जिल्ह्यात प्रसिद्ध असलेली ही शाळा आता पालकांच्या रोषाला व अविश्वासाला सामोरे जात आहे. पालकांनी प्रशासनाकडे तत्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.या शाळेत एका वर्षासाठी जवळपास सत्तर हजार रुपये फी आकारली जातेः पण येथे 'नाव मोठे पण दर्शन छोटे अशी परिस्थिती आहे. विद्यार्थ्यांना दोन वेळचे जेवण सुद्धा अत्यंत निकृष्ट दर्जाचे दिले जाते. अभ्यासाच्या नावाखाली विद्यार्थ्यांच्या जिवाशी खेळ केला जात आहे. त्यामुळे मुलामध्ये वारंवार अन्न विषवाद्याः आणि पोटाच्या आजारांत वाढ होत आहे. याकडे तातडीने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.



पावसाळ्याच्या दिवसांत पाण्यामुळे पोटाचे आजार होतात, यासाठी विद्यार्थ्यांना विशेष सूचना देण्यात आल्या आहेत, तसेच शाळेच्या मेसमध्ये वॉटर फिल्टर व स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले जाते. आतापर्यंत विषबाधेसारखा कोणताही प्रकार घडलेला नाही. गत काही दिवसांत काही विद्यार्थ्यांना अपचनाचा त्रास झाला होता, त्यासाठी त्यांना तत्काळ ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यानंतर सर्व काही ठीक आहे.

**प्रा. राजेंद चर्जन, मुख्याध्यापक**

# अमरावती जिल्ह्यात १९०० सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे

## ३८४ ठिकाणी 'एक गाव-एक गणपती' संकल्पना राबणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती**

अमरावती जिल्ह्यात गणेशोत्सवाची जय्यत तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. यंदा २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ दरम्यान सार्वजनिक गणेशोत्सव उत्साहात साजरा होणार असून, जिल्ह्यातील तब्बल १९०० सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे नोंदणीकृत झाली आहेत. त्यापैकी ३८४ ठिकाणी 'एक गाव-एक गणपती' ही अभिनव संकल्पना राबवली जाणार आहे.



गेल्या काही वर्षांत ग्रामीण भागात 'एक गाव-एक गणपती' या उपक्रमाने वेग घेतला आहे. २०२४ मध्ये ३४७ गावांनी हा प्रयोग यशस्वी केला होता. या संकल्पनेमुळे गावांतील वैमनस्य, राजकीय भेद मिटवून सामाजिक ऐक्याचा संदेश मिळाला. तसेच अनावश्यक स्पर्धा, पैशांचा दुरुपयोग आणि ध्वनीप्रदूषणावर नियंत्रण मिळाले. त्यामुळे यंदा या संकल्पनेचा अधिकाधिक विस्तार होईल, अशी अपेक्षा प्रशासन व नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

शहर पोलीस उपायुक्तालयाच्या हद्दीत गेल्या वर्षी ५८२ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे होती. यंदा निवडणुकीचे वर्ष असल्याने या संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे. शहरालगतच्या ३७ ग्रामपंचायतींमध्येही 'एक गाव-एक गणपती'चा उपक्रम राबविण्यात येत आहे. ग्रामीण पोलीस दलाच्या हद्दीत १४ तालुक्यातील ३१ पोलीस ठाण्यांमध्ये १३१८ मंडळांची नोंदणी झाली असून, त्यापैकी ३४७ गावांमध्ये ही संकल्पना राबवली गेली आहे.

गणेशोत्सव शांततेत व सुरक्षिततेत पार पाडण्यासाठी पोलीस दलाने सज्जता दाखवली आहे. या काळात ८० टक्के फोर्स ड्युटीवर असणार असून, उपविभागनिहाय व ठाणेनिहाय गणेश मंडळांच्या बैठका सुरू आहेत. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे हे सर्वात मोठे आव्हान असल्याने काटेकोर नियोजन करण्यात आले आहे.

यंदा खासगी व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना गणेशमूर्ती स्थापनेसाठी शासकीय परवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. सोसायटी व अपार्टमेंटमधील गणेशोत्सवांसाठीही ही अट लागू आहे. महापालिका आयुक्त, धर्मादाय आयुक्त, वीज वितरण कंपनी, वाहतूक पोलीस आदी विभागांची परवानगी घेणे आवश्यक आहे. १८ ऑगस्टपासून ऑनलाईन नोंदणी व परवानगी प्रक्रिया सुरू झाली असून, अपूर्ण अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, असे पोलीस विभागाने स्पष्ट केले आहे.

गणेशोत्सव हा जिल्ह्यातील प्रमुख सांस्कृतिक सोहळा आहे. परंतु त्याच वेळी 'एक गाव-एक गणपती' ही संकल्पना सामाजिक शिस्त, एकत्रतेचा संदेश आणि पर्यावरणपूरकता यांचा उत्तम संगम घडवते. जिल्ह्यातील ग्रामीण तसेच शहरी भागातील नागरिक या उपक्रमाला मोठ्या प्रमाणावर पाठिंबा देत आहेत.

# नया अकोला येथील रेल्वे कर्मचाऱ्याला मारहाण

## वलगाव पोलीस ठाण्यात दोन्ही आरोपींच्या विरोधात तक्रार दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील नया अकोला येथे धक्कादायक घटना घडली आहे नया अकोला येथील रेल्वे गेट क्रमांक अकरा येथे ड्युटीवर असलेले कर्मचारी अमोल हरीभाऊ इंगोले वय वर्षे ४२ यांना दिनांक २४ रविवार रोजी संध्याकाळी अकराच्या सुमारास दोन अनोळखी युवकांनी जबर मारहाण केली आहे रेल्वे कर्मचाऱ्याने वलगाव पोलिसांना दिलेल्या तक्रारीनुसार दोन अनोळखी युवक हे नांदुरा मार्गे नया अकोला येत होते मात्र तेवढ्यातच नया अकोला येथील गेट क्रमांक अकरा वरुन वलगाव वरुन येणारी रेल्वे मालगाडी ही नया अकोला येथील गेट क्रमांक अकरा वरुन चांदुर बाजार कडे जाणार असल्याने कुठलाही



अनुसूचित घटना नया अकोला येथील रेल्वे गेट क्रमांक अकरा येथे घडू नये यासाठी रेल्वे कर्मचाऱ्याने दोन्ही बाजूचे रेल्वे फाटक बंद केले रेल्वे कर्मचाऱ्यांने दोन्ही अनोळखी युवकांना असे म्हटले की सध्या रेल्वे मालगाडी येत आहे तुम्ही तुमची मोटार सायकल रेल्वे गेटच्या बाजूला घ्या मात्र तेवढ्यातच दोन्ही अनोळखी युवकांनी रेल्वे कर्मचाऱ्याला शिवीगाळ चालू केली व थापड बुक्क्यांनी लोखंडी सलाखीने रेल्वे कर्मचाऱ्याला जबर मारहाण केली आहे घडलेल्या घटनेची माहिती रेल्वे कर्मचाऱ्यांनी रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना सांगितली रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ घटनेचं गांभीर्य लक्षात घेता वलगाव पोलीस स्टेशन येथे दोन्ही अनोळखी युवकाच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे वलगाव पोलिसांनी तात्काळ नया अकोला येथील रेल्वे गेट क्रमांक अकरा येथे धाव घेतली व पंचनामा चालू केला असता आजूबाजूच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून व मोबाईल लोकेशनच्या माध्यमातून दोन्ही अनोळखी आरोपी युवकांचा शोध घेतल्या जात आहे याप्रकरणी वलगाव पोलिसांनी दोन्ही युवक आरोपींच्या विरोधात १३२.१२१ (१) ३ (५) असे गुन्हे दाखल केले आहेत पुढील तपास वलगाव पोलीस करत आहे घडलेली घटना निंदनीय असून संपूर्ण नया अकोला गावात हळहळ व्यक्त केल्या जात आहे.

# अमरावती जिल्ह्यात पावसाने दिली उसंत, शेतकऱ्यांनी घेतला मशागतीला वेग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती**

गेल्या दोन दिवसांपासून थांबलेल्या पावसामुळे जिल्ह्यातील शेतकरी वर्गाने पुन्हा शेतमळ्यात कामाचा धावपळ सुरू केली आहे. सततच्या मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणात सोयाबीन पिकाचे नुकसान झाले असून कपाशी पिकालाही मोठा फटका बसला आहे.दरम्यान, पाऊस थांबल्याने शेतकरी



मशागतीची कामे वेगाने पूर्ण करत आहेत. याचबरोबर सोयाबीन पिकावर रोग व कीडरोगाचा प्रादुर्भाव दिसू लागल्याने शेतकऱ्यांकडून कीटकनाशकांची फवारणी केली जात आहे. मात्र, सततच्या हवामान बदलामुळे ही फवारणी अधिक वेळा करावी लागत असून त्यामुळे शेतकऱ्यांचा खर्च वाढला आहे.शेतमालाचे उत्पादन घटल्याने आणि खर्च वाढल्याने शेतकऱ्यांचे दुहेरी संकट अधिकच गंभीर झाले आहे. प्रशासनाकडून मदत व मार्गदर्शनाची अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

# थाटात घोषणा, दहा वर्षात लागली वाट

## देशातील पहिल्या 'डिजिटल व्हिलेज'मध्ये इंटरनेटही मिळेना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६मेळघाट**

देशातील पहिले 'डिजिटल व्हिलेज' म्हणून मेळघाटातील हरिसाल या गावाची २०१५ साली मोठ्या थाटात घोषणा झाली. अवघ्या एका वर्षातच ते अस्तित्वातदेखील आले. मात्र लवकरच ते अपयशी ठरले. इंटरनेट सेवेच्या कोलदांड्यामुळे 'डिजिटल व्हिलेज'चे नुसते स्वप्नच भंगले नाही तर शासनाची ही योजना फसवी ठरल्याचा प्रत्यय मेळघाटवासीयांना आला. आज दहा वर्षानंतर 'डिजिटल व्हिलेज हरिसाल' असा फलकच तेथे दिसतो. योजना मात्र बासनात गुंडाळल्या गेल्या. जिल्हा प्रशासनाने याकडे लक्ष दिले




असते तर हरिसाल हे खरंच आदर्श गाव ठरले असते. मेळघाटातून कुपोषणाला हद्दपार करून तेथील आदिवासी नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळावा, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने कृती आराखडा तयार करण्यात आला होता. त्यातून हरिसाल हे 'डिजिटल व्हिलेज' म्हणून

> सरकारी गावकऱ्यांना योजना आणि सेवांचा लाभ घेता यावा, यासाठी डिजिटल कार्यालय स्थापन करण्यात आले होते. मात्र आता तेही बंद झाले आहे. एकंदरीत डिजिटल सुविधा कुठेही दिसत नाही.'
>
> **– सलीम भटारा, माजी उपसरपंच, हरिसाल.**

नावारूपास आले. राज्य शासन आणि मायक्रोसॉफ्ट यांच्यात झालेल्या करारानुसार धारणी तालुक्यातील हरिसाल गावाला इंटरनेट सेवेच्या माध्यमातून जगाशी जोडण्यात आले.

जगाच्या नकाशावर हरिसालची ओळख झाली. परंतु स्थानिक जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याने हे गाव आज 'एक्स डिजिटल व्हिलेज' झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ड्रीम प्रोजेक्ट असल्याने संपूर्ण शासकीय यंत्रणा कामी लागली होती. तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांच्या अनेक वाऱ्या झाल्या. गावात मोफत वाय-फायची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. अखंड कनेक्टिव्हिटी सुनिश्चित करण्यासाठी भूमिगत फायबर ऑप्टिक केबल्स टाकण्यात आल्याचा दावाही करण्यात आला. मात्र अवघ्या काही वर्षातच ही सेवा बंद झाली. ७५० एटीएम कार्डचे वाटप करण्यात आले होते. प्रत्यक्षात किती सुरू आहेत, याचा शोध घेण्याची गरज आहे.

# नेहरू मैदानातून पीओपी मूर्तींची दुकाने हटवली

## शहरात ७१ हजार तर जिल्ह्यात ३ लाख मातीच्या गणेशमूर्तींचे उत्पादन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती**

नेहरू मैदानावरील मातीच्या गणेशमूर्तींसाठी खास आरक्षित बाजारपेठेत काही विक्रेत्यांनी मातीच्या मूर्तींच्या नावाखाली प्लॅस्टर ऑफ पॅरिस (पीओपी) मूर्तींची विक्री सुरू केली होती. मात्र सोमवारी ही बाब लक्षात येताच कुंभार माती कला सुधार समितीने तातडीने कारवाई करून त्या दुकानाला सील ठोकले आणि संपूर्ण माल त्वरित मैदानाबाहेर नेण्याचे आदेश दिले. संबंधित विक्रेत्याने नंतर आपला माल इतरत्र हलवला. समितीचे सचिव कैलाश रोतडे व अध्यक्ष चरण उचाडे यांच्यासह अन्य सदस्यांच्या उपस्थितीत ही कारवाई करण्यात आली.



समिती अध्यक्षांनी दिलेल्या माहितीनुसार यावर्षी शहरातील मूर्तिकारांनी तब्बल ७१ हजार मातीच्या गणेशमूर्ती तयार केल्या आहेत. त्यापैकी ४० दुकाने नेहरू मैदानात विक्रीसाठी मनपा प्रशासनाने उपलब्ध करून दिली आहेत.जिल्ह्यातील मूर्तिकारांनी यावर्षी तब्बल ३ लाख मातीच्या गणेशमूर्ती तयार केल्या असून त्यालाच नागरिकांकडून प्राधान्य दिले जात आहे.

**फक्त मातीच्या मूर्तींनाच परवानगी**

यावर्षी नेहरू मैदानात फक्त मातीच्या मूर्तींची विक्री होणार आहे. मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांच्या आदेशानुसार हा विशेष बदल करण्यात आला असून पर्यावरण संवर्धनाला चालना देण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे.

**भक्तांचा आग्रह – भैया, पक्की मातीचीच आहे ना?**

बाजारात मूर्ती खरेदीसाठी येणारे गणेशभक्त विक्रेत्यांना वारंवार विचारताना दिसत आहेत – ही मूर्ती खरंच मातीचीच आहे ना? काही दुकानदार पीओपी मूर्तीला मातीची असल्याचे सांगून विक्री करत असल्याने भक्त सावध झाले आहेत. पर्यावरणपूरक मातीच्या मूर्तींना नागरिकांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे.

# गणपती बाप्पाच्या सजावटीच्या साहित्याने बाजारपेठा बहरल्या

## 'इको-फ्रेंडली' डेकोरेशनला भाविकांचा प्रतिसाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती**

गणेशोत्सवासाठी आरास व सजावट साहित्यांनी बाजारपेठा बहरल्या आहेत. पणत्या, रंगीबेरंगी रोषणाई, मखर, तोरण आणि विविध प्रकारच्या फुलांच्या माळांनी पेठा फुलून गेल्या आहेत.

बाजारात लाकडी, रबर शीट, फोम शीट, फायबरपासून बनवलेले मखर उपलब्ध आहेत. यामध्ये राजेशाही सिंहासन, मोर, कमळ, अशा अनेक डिझाइन्सना ग्राहकांची पसंती आहे. थर्माकोलला



पर्याय म्हणून पुठ्ठा आणि कागदापासून बनवलेले मखर, सजावटीचे साहित्य आले आहे. ते वजनाला हलके, पर्यावरणपूरक आहे. मूर्तींना आकर्षक रूप देण्यासाठी रंगीत वस्त्रे, दागिने, मुकुट यांनाही मागणी असल्याचे दिसून येत आहे.बनवायला सोपे, दिसायला आकर्षक असल्याने तयार छोट्या डेकोरेशन सेटअपला मोठ्या प्रमाणावर मागणी असल्याचे दिसून येत आहे. सजावटीसाठी कागदी फुले, रंगीत कापड, मोत्यांच्या माळा, विविध रंगांचे कागद, पुढे, गोंद, चमकी आणि नैसर्गिक रंग यांसारख्या वस्तुंना मोठी मागणी आहे.

# जुन्या तहसीलच्या विहिरीत अज्ञात व्यक्तीचा मृतदेह

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ अमरावती**

जुन्या तहसील परिसरातील विहिरीत एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने शहरात खळबळ उडाली आहे. सुमारे ४५ ते ५० वर्षे वय असलेल्या या व्यक्तीची ओळख अद्याप पटू शकलेली नाही.

मंगळवारी सकाळी स्थानिक नागरिकांना विहिरीत तरंगत असलेला मृतदेह दिसताच त्यांनी पोलिसांना कळिवले. अग्निशमन दलाच्या जवानांनी जवळपास तासाभराच्या प्रयत्नांनंतर मृतदेह बाहेर काढला. मृतदेह पूर्णतः कुजलेला असल्यामुळे मृताची ओळख पटणे अवघड ठरत आहे.पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शासकीय रुग्णालयाच्या शवविच्छेदनगृहात पाठविला असून, तपास सुरू आहे.

# अमरावतीत सणोत्सव काळात मंडप तपासणी व ध्वनीप्रदूषण नियंत्रण समिती गठीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

उद्या पासून होऊ घातलेल्या सार्वजनिक सण-उत्सव काळात शहरात उभारण्यात येणारे मंडप / पेंडॉल तसेच ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी महानगरपालिकेकडून विशेष तपासणी व तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आली आहे.महानगरपालिका उपायुक्त (२) यांनी जारी केलेल्या आदेशानुसार, पाचही झोनसाठी स्वतंत्र मंडप तपासणी व



ध्वनीप्रदूषण नियंत्रण समित्यांमध्ये संबंधित सहाय्यक आयुक्त, उपअभियंता, सहाय्यक अभियंता, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक व स्वास्थ निरीक्षकांचा समावेश आहे. स्वास्थ अधिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली जेष्ठ स्वास्थ निरीक्षकांच्या भरारी पथकाचीही स्थापना करण्यात आली आहे.

यासोबतच, मा. उच्च न्यायालयाच्या जनहित याचिका क्र.१७३/२०१ नुसार जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त तसेच पोलीस विभागाचे प्रतिनिधी यांचा सहभाग असलेली समिती गठीत करण्यात आली आहे.सार्वजनिक मंडळांना मंडप/पेंडॉल उभारणीसाठी अद्यावत अटी व शर्तींसह परवानगी दिली जाणार असून, ध्वनीप्रदूषण नियंत्रण नियमांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ध्वनीप्रदूषण अथवा मंडप उभारणी संदर्भातील कोणतीही तक्रार नागरिक पोलीस प्रशासनासोबतच महानगरपालिकेकडेही नोंदवू शकतात.नागरिकांच्या सोयीकरिता झोननिहाय संपर्क क्रमांक व माहिती संबंधित झोन कार्यालयांच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आली असल्याची माहितीही महानगरपालिकेकडून देण्यात आली आहे.

# आंदोलन स्थळीच महिलांनी केले हरतालिकेचं पूजन व आरती

## कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांचं जिल्हा परिषदेपुढे अनोखं आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

समान काम समान वेतनाच्या मागणीसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांचं आंदोलन अमरावतीत उग्र झालं आहे. १९ ऑगस्टपासून सुरु झालेलं कामबंद आंदोलन आज सातव्या दिवशीही कायम असून, प्रशासनाकडून दखल न घेतल्याने कर्मचाऱ्यांचा संताप वाढला



आहे.कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी शासकीय सेवेत सामावून घ्यावे, या मुख्य मागणीसाठी जिल्हा परिषद समोर मोठ्या संख्येने कर्मचारी आंदोलन करत आहेत. दरम्यान, आंदोलनात सहभागी महिला कर्मचाऱ्यांनी हरतालिकेचं पूजन व आरती करून आपलं आंदोलन नोंदवलं. या अनोख्या आंदोलनाकडे शहरवासीयांचं लक्ष वेधलं गेलं.जिल्हाभरातील कंत्राटी आरोग्य कर्मचारी या आंदोलनात सहभागी होत असून, त्यामुळे ग्रामीण व शहरी भागातील आरोग्य सेवा विस्कळीत झाली आहे. रुग्णसेवा ठप्प झाल्याने सर्वसामान्य जनतेलाही याचा मोठा फटका बसतोय.